निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
गुरुवार
०५ फेब्रुवारी २०२६
पान: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३४० वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

# स्वामी सत्यमित्रानंद गिरी सनातन संस्कृतीचे महावाहक; त्यांचे समाधी मंदिर भावी पिढ्यांसाठी ठरेल प्रेरणास्थान - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**हरिद्वार/प्रतिनिधी/** श्री स्वामी सत्यमित्रानंद गिरी यांनी केवळ धर्मप्रसार केला नाही, तर ते सनातन संस्कृतीचे प्रमुख वाहक म्हणून जगले. त्यांच्या निस्पृह कार्यामुळेच आजच्या नव्या पिढीसमोर भारतीय संस्कृतीची महानता अढळ उभी आहे. हरिद्वार येथे उभारलेले त्यांचे समाधी मंदिर केवळ एक वास्तू नसून, ते येणाऱ्या पिढ्यांसाठी ऊर्जे चे आणि प्रेरणेचे स्रोत ठरेल, असे गौरवपूर्ण उद्गार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

उत्तराखंडमधील हरिद्वार येथे श्री स्वामी सत्यमित्रानंद गिरीजी महाराज यांच्या समाधी मंदिरात 'श्रीविग्रह मूर्ती स्थापना' सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.या आध्यात्मिक सोहळ्याला देशातील अनेक मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली. यामध्ये प्रामुख्याने रामनाथ कोविंद (माजी राष्ट्रपती, भारत),स्वामी अवधेशानंद गिरीजी (जुनापीठाधिश्वर आचार्य महामंडलेश्वर),स्वामी गोविंददेव गिरीजी (राम जन्मभूमी मंदिर न्यास),गुलाबचंद कटारिया (पंजाबचे राज्यपाल),राजेंद्र शुक्ल (उपमुख्यमंत्री) तसेच स्वामी अखिलेश्वरानंदजी, स्वामी हरिचेतनानंदजी आणि इतर संत-महंत उपस्थित होते.

**मानवतेचा वैश्विक संदेश आणि त्यागाची मूर्ती**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वामीजींच्या कार्याचा आढावा घेताना सांगितले की, संत परंपरा समाजाला जोडण्याचे आणि एकसंध ठेवण्याचे काम करते. स्वामी सत्यमित्रानंद गिरी यांनी **'भारत माता मंदिरा'**च्या माध्यमातून राष्ट्रभक्ती आणि अध्यात्माची सांगड घातली.स्वामीजींनी आपले संपूर्ण आयुष्य मानवतेसाठी अर्पण केले. जेव्हा जेव्हा देशावर किंवा समाजावर संकट आले, तेव्हा त्यांनी जात-पात आणि



भेद बाजूला सारून मदतीचा हात दिला. कार्यासाठी त्यांनी अनेकदा मोठ्या पदांचा त्याग केला, म्हणूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व जागतिक स्तरावर अद्भूत मानले जाते, असे फडणवीस म्हणाले.

**विज्ञान आणि इतिहासाच्या कसोटीवर सनातन संस्कृती**

जगातील अनेक प्राचीन संस्कृती काळाच्या ओघात नष्ट झाल्या, मात्र भारतीय सनातन संस्कृती आजही तितकीच प्रवाही आहे. यावर भाष्य करताना मुख्यमंत्री म्हणाले की, सरस्वती संस्कृतीच्या उत्खननातून मिळालेल्या पुराव्यांनी हे सिद्ध केले आहे की आपली जीवनपद्धती केवळ श्रद्धेवर नाही, तर विज्ञान आणि इतिहासाच्या कसोटीवरही खरी उतरली आहे. ही समृद्ध संस्कृती टिकवण्यात स्वामीजींसारख्या महापुरुषांचे योगदान मोलाचे आहे.

**पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात सांस्कृतिक पुनरुत्थान**

देशात सध्या सुरू असलेल्या सांस्कृतिक बदलांचा उल्लेख करत मुख्यमंत्री म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संस्कृतीच्या पुनरुत्थानाला मोठी गती मिळाली आहे.

आजची तरुण पिढी पाश्चिमात्य प्रभावातून बाहेर पडून आपल्या मुळांशी जोडली जात आहे आणि त्यांना आपल्या संस्कृतीचा सार्थ अभिमान वाटू लागला आहे. हे परिवर्तन घडवून आणण्यात संत आणि महंतांच्या विचारांचा पाया अत्यंत मजबूत आहे.

## कर्तव्यनिष्ठेचा गौरव: पाचोड येथे भारत लांडगे पाटील यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**पाचोड (पैठण) प्रतिनिधी/बबन उदावंत** /सार्वजनिक बांधकाम विभाग, पैठण येथील कनिष्ठ लिपिक भारत नामदेव लांडगे पाटील यांचा प्रदीर्घ सेवेनंतरचा निवृत्ती सोहळा सोमवार, २ फेब्रुवारी २०२६ रोजी सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक ३, पाचोड येथे अत्यंत भावूक आणि उत्साही वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान उपविभागीय अभियंता राजेंद्र बोरकर पाटील यांनी भूषविले. यावेळी बोलताना त्यांनी भारत लांडगे यांच्या कार्याचा गौरव केला. ते म्हणाले की, भारत लांडगे यांनी आपल्या संपूर्ण सेवाकाळात केवळ काम केले नाही, तर प्रामाणिकपणा, शिस्त आणि कर्तव्यनिष्ठेचा आदर्श निर्माण केला. कार्यालयीन कामकाजातील त्यांची सहकार्याची वृत्ती विभागासाठी नेहमीच मोलाची ठरली आहे. अशा निष्ठावान कर्मचाऱ्यांमुळेच शासकीय विभागांची विश्वासार्हता टिकून राहते.

सहकाऱ्यांच्या ऋणात राहणे हीच मोठी शिदोरी - लांडगे पाटील

सत्काराला उत्तर देताना भारत लांडगे पाटील भावूक झाले होते. आपल्या भावना व्यक्त करताना ते म्हणाले, आज या टप्प्यावर मागे वळून पाहताना समाधान वाटते. वरिष्ठ अधिकारी आणि सहकाऱ्यांचे मला जे प्रेम आणि मार्गदर्शन मिळाले, तीच माझ्या आयुष्याची मोठी कमाई आहे. या विभागातील प्रत्येक अनुभव मी आयुष्यभर जपेन.

या सोहळ्याला विभागातील अनेक अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने शाखा अभियंता: प्रमोद मोरे, योगराज चव्हाण, मुकेश तोनगिरे, गणेश यादव, कनिष्ठ अभियंता: लक्ष्मण तनपुर, स्थापत्य अभियंता: गणेश मस्के, किरण कोल्हे,कर्मचारी: कनिष्ठ लिपिक बाळासाहेब केदार कोरडे, सुभान पठाण, सुनील खरात.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारत लांडगे पाटील यांचा पुष्पगुच्छ, शाल आणि सन्मानचिन्ह देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. उपस्थित सहकाऱ्यांनी त्यांच्या सोबतच्या आठवणींना उजाळा दिला आणि त्यांच्या पुढील निरामय आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. अत्यंत कौटुंबिक आणि आपुलकीच्या वातावरणात या सोहळ्याची सांगता झाली.

## जालना हादरले!

# नैसर्गिक अनुदान घोटाळ्याचा 'मास्टरमाइंड' गजाआड

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**नैसर्गिक आपत्तीच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशांवर दरोडा टाकणाऱ्या रॅकेटचा मुख्य सूत्रधार, घनसावंगी तहसीलचा सहाय्यक महसूल अधिकारी आशिष पैठणकर याला अखेर आर्थिक गुन्हे शाखेने (EOW) बेड्या ठोकल्या आहेत. तब्बल पाच महिने पोलिसांना गुंगारा देणारा हा 'व्हाईट कॉलर' गुन्हेगार आता पोलिसांच्या कोठडीत असून, या घोटाळ्याचे धागेदोरे मंत्रालयापर्यंत पोहोचण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

**आर्थिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई**

अंबड आणि घनसावंगी तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले होते. सरकारने मदतीचा हात म्हणून कोट्यवधींचे अनुदान जाहीर केले. मात्र, या आपत्तीत इष्टापत्ती शोधणाऱ्या आशिष पैठणकर आणि त्याच्या टोळीने चक्क २४ कोटी ९० लाख ७७ हजार ८११ रुपयांचा अपहार केला. ज्यांच्या नावे जमीन नाही, अशा बोगस व्यक्तींची नावे यादीत घुसवून सरकारी तिजोरीवर दरोडा टाकण्यात आला.

असा उघड झाला २५ कोटींचा 'महाघोटाळा'

तक्रारींचा पाऊस: बोगस नावे अपलोड करून अनुदान लाटल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी समिती नेमली होती.

**चौकशीत धक्कादायक वास्तव:** २४० गावांच्या तपासणीत तब्बल २४.९० कोटींचा अपहार झाल्याचे समोर आले.

**गुन्हा दाखल:** अंबड पोलीस ठाण्यात (गु.र.क्र. ४५३/२०२५) भारतीय न्याय संहिता (इछड) आणि आपत्ती व्यवस्थापन कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

**५ महिने लपाछपी, अखेर जाळ्यात!**

आशिष पैठणकर हा अत्यंत शातीर पद्धतीने पोलिसांना चकवा देत होता. अटकपूर्व जामिनासाठी धडपडत असतानाच त्याने आपले लोकेशन मिळू नये म्हणून वारंवार मोबाईल आणि मुक्काम बदलले. कधी धार्मिक स्थळांचा आश्रय तर कधी अज्ञात ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या पैठणकरला जालना पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचून अटक केली.

एजंटांचे जाळे आणि कोट्यवधींची माया

तपासात समोर आले आहे की, पैठणकर याने गावोगावी आपले **'एजंट'** नेमले होते. या एजंटांमार्फत त्याने बोगस नावे गोळा केली आणि महसूल विभागातील आपल्या अधिकाराचा गैरवापर करून ती यादीत समाविष्ट केली. या घोटाळ्यात आतापर्यंत ३२ आरोपींना अटक करण्यात आली असून, पैठणकरच्या अटकेमुळे महसूल विभागातील अनेक बड्या धेंडांचे धाबे दणाणले आहेत.

**तपासाची चक्रे फिरली: कोणाचे 'निकाले' निघणार?**

पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी आणि ईओडब्ल्यूचे प्रभारी सिद्धार्थ माने यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. आशिष पैठणकरच्या चौकशीतून आणखी किती अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नावे समोर येतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

शेतकऱ्यांच्या हक्काचा एकही रुपया चोरणाऱ्याला सोडले जाणार नाही, तपासाची व्याप्ती वाढवून सर्व दोषींना जेलची हवा खायला लावू! - असा कडक संदेश पोलीस प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

# अखेरचा प्रवास त्याच मर्सिडीजमधून... बीडमध्ये अजितदादांच्या अस्थींचे गोदावरीत विसर्जन

**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड/ प्रतिनिधी/** महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धडाडीचे नेतृत्व आणि राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने संपूर्ण राज्य शोकाकुल आहे. बुधवारी बीडमध्ये त्यांच्या अस्थिकलशाची मिरवणूक काढून अत्यंत भावूक वातावरणात गोदावरी नदीत अस्थींचे विसर्जन करण्यात आले. विशेष म्हणजे, अजित पवार बीड दौऱ्यावर असताना ज्या मर्सिडीज कारमधून प्रवास करायचे, त्याच कारमधून आज त्यांचा अस्थिकलश विसर्जनासाठी नेण्यात आला.

**बीडमध्ये जनसागराचे दर्शन**

सकाळी १० वाजता राष्ट्रवादी काँग्रेसच्या मध्यवर्ती कार्यालयात अजितदादांचा अस्थिकलश कार्यकर्त्यांच्या आणि नागरिकांच्या अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात आला होता. यावेळी आमदार धनंजय मुंडे, विजयसिंह पंडित, प्रकाश सोळंके आणि अनेक माजी आमदारांनी उपस्थित राहून दादांना श्रद्धांजली वाहिली. धनंजय मुंडे जेव्हा सभागृहात दाखल झाले, तेव्हा -ख च्या माध्यमातून तयार करण्यात आलेली अजितदादांची एक ऑडिओ क्लिप ऐकवण्यात आली, ज्यामुळे उपस्थित असलेले सर्व कार्यकर्ते आणि नागरिक अत्यंत भावूक झाले.



**अश्रूंच्या धारांनी दिला निरोप**

कार्यालयातील दर्शनानंतर, अस्थिकलश मर्सिडीज कारमधून गोदावरी नदीकाठी असलेल्या शनी मंदिर येथे नेण्यात आला. या प्रवासात रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. धनंजय मुंडे यांच्या हस्ते विधीवत पूजा करून अस्थींचे विसर्जन करण्यात आले.

**आमदार राजेश विटेकर यांच्या घरी 'दादा' आले, पण कलशात...**

अजित पवार यांच्या निधनाने त्यांचे समर्थक किती खचले आहेत, याचे हृदयद्रावक दृश्य सोनपेठ येथे पाहायला मिळाले. आमदार राजेश विटेकर यांना दादांनी शब्द दिला होता की, निवडणुका आणि अधिवेशन संपल्यावर तुझ्या सोनपेठच्या घरी जेवायला येईल.दादांनी शब्द पाळला, पण ते जिवंतपणी येऊ शकले नाहीत.

त्यांचा अस्थिकलश जेव्हा विटेकर यांच्या घरी पोहोचला, तेव्हा आमदार राजेश विटेकर आणि त्यांच्या माता, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष निर्मलाताई विटेकर यांनी रथावरच एकमेकांना बिलगून टाहो फोडला. दादा घरी आले, पण कलशाच्या रूपात, या भावनेने उपस्थित असलेल्या हजारो कार्यकर्त्यांचे डोळे पाणावले.

**कसा झाला अपघात?**

२८ जानेवारी रोजी बारामती येथे येत असताना अजित पवार यांच्या विमानाला भीषण अपघात झाला.

धावपट्टीवर उतरत असताना विमानाचा जमिनीवर जोरात आघात झाला आणि स्फोट झाला. या दुर्दैवी घटनेत अजित पवार यांच्यासह पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. २९ जानेवारी रोजी बारामतीच्या विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले होते.

# पुणे-मुंबई एक्सप्रेसवेवर टँकर अपघाताचा मोठा फटका; १३९ बस फेऱ्या रद्द

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** पुणे-मुंबई एक्सप्रेसवेवर आज झालेल्या एका टँकर अपघातामुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. या परिस्थितीमुळे एसटी महामंडळाला आपल्या १३९ बस फेऱ्या रद्द करण्याचा निर्णय घ्यावा लागला आहे.प्रमुख आकडेवारी आणि तपशीलअपघातामुळे निर्माण झालेल्या गोंधळात प्रवाशांचे हाल होऊ नयेत म्हणून परिवहन विभागाने तातडीने पावले उचलली आहेत. रद्द करण्यात आलेल्या फेऱ्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:एकूण रद्द फेऱ्या: १३९ ई-शिवनेरी (E-Shivneri): ७३ फेऱ्या रद्दइतर बसेस (साध्या व निमआराम): ६६ फेऱ्या रद्दकोंडीत अडकलेली वाहने (विभागनिहाय)केवळ फेऱ्या रद्द झाल्या नाहीत, तर महामंडळाची १६३ वाहने सध्या एक्सप्रेसवेवरील वाहतूक कोंडीत अडकून पडली आहेत. यामध्ये विविध विभागांचा समावेश आहे:विभागअडकलेली वा हनेसातारा४६सोलापूर३६पुणे२०सांगली१८कोल्हापूर१३पालघर१२ठाणे१ १मुंबई०७प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्यमहाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे की, प्रवाशांची सुरक्षितता ही त्यांची सर्वोच्च प्राथमिकता आहे. रस्ता मोकळा होईपर्यंत प्रवाशांना अधिक त्रास होऊ नये, यासाठी परिस्थितीचा सातत्याने आढावा घेतला जात आहे.वाहतूक सुरळीत होताच बस सेवा टप्प्याटप्प्याने पूर्ववत करण्यात येतील. प्रवाशांनी सहकार्य करावे आणि शक्य असल्यास प्रवासाचे नियोजन बदलून पर्यायी मार्गांचा विचार करावा, असे आवाहन परिवहन विभागामार्फत करण्यात आले आहे.पुढील उपाययोजनासध्या वाहतूक पोलीस आणि संबंधित यंत्रणा एक्सप्रेसवेवरील कोंडी फोडण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करत आहेत.

## संक्षिप्त

### मंत्री गुलाबराव पाटील यांचे उड्डाण का रद्द झाले?

**आत्ताच एक्सप्रेस**

**लातूर/प्रतिनिधी/**जिल्ह्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी गुलाबराव पाटील दौऱ्यावर होते. प्रचाराचे वेळापत्रक व्यस्त असल्याने त्यांनी विमानाने प्रवास करण्याचे नियोजित केले होते. मात्र, खालील कारणांमुळे त्यांचे उड्डाण रद्द झाले:



क्लिअरन्सची प्रतीक्षा: 'व्होसेट एव्हिएशन' कंपनीच्या सहा आसनी विमानाला उड्डाणासाठी हैदराबाद, बिदर आणि चेन्नई येथून आवश्यक तांत्रिक क्लिअरन्स मिळणे गरजेचे होते.

वेळेची मर्यादा: साडेचार वाजल्यापासून ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत या क्लिअरन्सची प्रतीक्षा करण्यात आली. मात्र, ठराविक वेळेत परवानगी न मिळाल्याने पायलटने उड्डाण करण्यास असमर्थता दर्शवली.

लातूर विमानतळावरील मर्यादा: लातूर विमानतळावर रात्रीच्या वेळी किंवा अंधारात विमान उड्डाण करण्यासाठी आवश्यक असणारी प्रगत यंत्रणा उपलब्ध नाही. त्यामुळे अंधार होण्यापूर्वी उड्डाण करणे अनिवार्य होते.अखेर, उड्डाण शक्य नसल्याने मंत्री गुलाबराव पाटील यांना तातडीने चारचाकी वाहनाने छत्रपती संभाजीनगरकडे रवाना व्हावे लागले.

**पंकजा मुंडे यांच्या हेलिकॉप्टरमध्येही तांत्रिक बिघाड**

केवळ गुलाबराव पाटीलच नव्हे, तर भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनाही अशाच प्रसंगाला सामोरे जावे लागले होते. छत्रपती संभाजीनगर येथून लातूरला प्रचारासाठी निघण्यापूर्वीच त्यांच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड असल्याचे निष्पन्न झाले.

या घटनेनंतर बोलताना पंकजा मुंडे यांनी माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाचा संदर्भ दिला. त्या म्हणाल्या, जेव्हापासून अजितदादांचा विमान अपघातात मृत्यू झाला आहे, तेव्हापासून अशा तांत्रिक बिघाडांकडे पाहताना मनात धडकी भरते. त्या अपघातावेळी त्या विमानात असलेल्या लोकांनी काय भयानक यातना भोगल्या असतील, याचा विचार करून मी अस्वस्थ होते.

**निवडणुकीच्या काळात हवाई प्रवासाचे आव्हान**

राज्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी शिगेला पोहोचली आहे. जास्तीत जास्त सभा गाठण्यासाठी नेते हेलिकॉप्टर आणि चार्टर विमानांचा वापर करत आहेत. मात्र, हवामानातील बदल, तांत्रिक बिघाड आणि 'एअर ट्रॅफिक कंट्रोल' कडून मिळणारा क्लिअरन्स या गोष्टींमुळे अनेकदा नेत्यांचे नियोजित वेळापत्रक कोलमडत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.

### ९ फेब्रुवारी रोजी 'विभागीय लोकशाही दिना'चे आयोजन;

**तक्रारदारांसाठी महत्त्वाची नियमावली जाहीर**

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/**नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी आणि प्रशासकीय कामात पारदर्शकता आणण्यासाठी फेब्रुवारी महिन्याचा विभागीय स्तरीय 'लोकशाही दिन' सोमवार, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. विभागीय आयुक्त कार्यालयात सकाळी ११ वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाद्वारे देण्यात आली आहे.अर्ज प्रक्रिया आणि ठिकाणज्या नागरिकांना आपल्या तक्रारी मांडायच्या आहेत, त्यांनी विहित नमुन्यातील (प्रपत्र-१ क) अर्ज दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. हे अर्ज विभागीय आयुक्त कार्यालयातील आवक शाखा प्रमुख (नायब तहसीलदार) यांच्याकडे आवश्यक कागदपत्रांसह जमा करावेत.महत्त्वाची सूचना: अर्जदारांनी अर्जाच्या दोन प्रती लोकशाही दिनाच्या दिवशी विभागीय आयुक्तांकडे समक्ष पुन्हा सादर करणे बंधनकारक आहे. लोकशाही दिनाचे नियम आणि अटीविभागीय लोकशाही दिनासाठी प्रशासनाने काही महत्त्वपूर्ण निकष निश्चित केले आहेत:जिल्हा स्तरावरील प्रलंबित प्रश्न: केवळ असेच प्रश्न या दिनी स्वीकारले जातील, जे जिल्हास्तरीय लोकशाही दिनात सुटू शकले नाहीत किंवा ज्या निर्णयावर तक्रारदाराचे समाधान झालेले नाही.पुनर्विचार अर्ज नाही: ज्या नागरिकांनी यापूर्वी विभागीय लोकशाही दिनात अर्ज दिले आहेत आणि त्यावर कार्यवाही सुरू आहे, अशा प्रकरणांत पुन्हा अर्ज देता येणार नाही.अर्जाचा नमुना: तक्रार अर्ज विहित नमुना प्रपत्र-१ (क) मध्येच असणे आवश्यक आहे.थोडक्यात माहिती:तपशीलमाहितीदिनांक९ फेब्रुवारी २०२६वेळसकाळी ११:०० वाजतास्थळविभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगरअर्ज स्वीकारणारेआवक शाखा प्रमुख (नायब तहसीलदार)प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, जिल्हा स्तरावर प्रलंबित असलेल्या समस्यांच्या निवारणासाठी या संधीचा लाभ घ्यावा.

### इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी परीक्षेसाठी परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा इयत्ता १२ वी दि. १० फेब्रुवारी २०२६ ते दि. १८ मार्च २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील एकुण ७९ परीक्षा केंद्रांवर तसेच माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा इयत्ता १० वी दि. २० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील एकुण १०२ परीक्षा केंद्रावर घेण्यात येणर आहे. वरील परीक्षा केंद्राच्या परिसरात अशांतता निर्माण होऊन परीक्षा कालावधीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने नमुद परीक्षा उपकेंद्रांच्या २०० मीटर परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागु करुन प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याचे अपर जिल्हादंडाधिकारी यांनी आदेशीत केले आहे.या आदेशान्वये परीक्षा केंद्राच्या २०० मीटर परिसरात परीक्षेच्या दिवशी आदेशात नमुद कालावधीत सर्व सार्वजनिक टेलिफोन/एसटीडी बुथ/फॅक्स/ झेरॉकस केंद्र व ध्वनीक्षेपके बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. हा आदेश परीक्षेच्या दिवशी सकाळी ८.०० वाजेपासुन सायंकाळी ८.०० वाजेपर्यंत अंमलात राहील.

# बाबासाहेब सर्वांचेच, मग कृतघ्नता कोणासाठी?

संविधान- हा केवळ एक ग्रंथ नाही, तर या देशातील श्वास घेणाऱ्या प्रत्येक सजीवाचा जगण्याचा अधिकार आहे. पण दुर्दैवाने, ज्या महापुरुषाने हा अधिकार आपल्याला बहाल केला, त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आज आपण कृतज्ञतेने स्वीकारण्याऐवजी जातीच्या भिंतींमध्ये बंदिस्त केले आहे. प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यात जेव्हा संविधान निर्मात्याचे नाव घेण्याचे किंवा त्यांचे स्मरण करण्याचे टाळले जाते, तेव्हा ती केवळ एका व्यक्तीची अवहेलना नसते, तर ती त्या लोकशाही मूल्यांची हार असते ज्यावर हा देश उभा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म एका विशिष्ट जातीत झाला, हे वास्तव असले तरी त्यांचे विचार आणि कार्य हे संपूर्ण मानवजातीसाठी होते. त्यांनी केवळ अस्पृश्यांसाठी लढा दिला नाही, तर हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून महिलांना अधिकार दिले, कामगारांसाठी कामाचे तास निश्चित केले आणि जल-विद्युत धोरणांच्या माध्यमातून देशाच्या विकासाचा पाया रचला. पण आजच्या समाजाचे दोन भाग झाले आहेत: एक जो त्यांना हक्काने 'आपले' मानतो पण त्यात संकुचितपणा आणतो, आणि दुसरा जो त्यांच्या उपकारांची फळे चाखतो पण केवळ 'जाती'मुळे त्यांना आपले मानायला तयार नाही.

संविधान ही एक सामूहिक जबाबदारी होती, हे नाकारता येणार नाही. मसुदा समितीत सात सदस्य होते, हेही सत्य आहे. परंतु, खुद्द टी. टी. कृष्णमाचारी यांनी संविधान सभेत मान्य केले होते की, समितीतील काहींनी राजीनामा दिला, काही आजारी होते, तर काही दिल्लीपासून दूर होते; त्यामुळे संविधान लिहिण्याचे संपूर्ण ओझे एकट्या डॉ. आंबेडकरांनी वाहिले. शाळेचा मुख्याध्यापक जसा सर्वांना सोबत घेऊन शाळा नावारूपाला आणतो, तसेच बाबासाहेबांनी मसुदा समितीचे नेतृत्व केले. तरीही, इतर सदस्यांची नावे मुद्दाम हटवण्यात आली, असा जो तर्क लावला जातो, तो ऐतिहासिक सत्यापेक्षा राजकीय द्वेषातून अधिक येतो. संविधानावर स्वाक्षरी करणाऱ्या २८४ सदस्यांचे योगदान महत्त्वाचे आहेच, पण त्या विचारांना दिशा देणारा 'शिल्पकार' मात्र एकच होता.

अनेकांना वाटते की संविधान केवळ माणसांसाठी आहे. परंतु, संविधानातील तरतुदींनुसार आज देशातील पशू-पक्षी, वृक्षवल्ली आणि पर्यावरण सुरक्षित आहे. संविधानाने निसर्गालाही अधिकार दिले आहेत. ज्या महापुरुषाने 'माणूस' म्हणून सर्वांना समान पातळीवर आणले, त्यांच्याबद्दलचा तिरस्कार ही आपली वैचारिक दिवाळखोरी आहे.

बाबासाहेबांनी स्वतः कधीही स्वतःचे दैवतीकरण होऊ दिले नाही. मूर्तीपूजा किंवा स्वतःची आरती त्यांना अपेक्षित नव्हती. त्यांना अपेक्षित होता तो 'संवैधानिक नैतिकता' पाळणारा समाज. आज लोक संविधानानुसार मिळणाऱ्या सवलती घेतात, कायद्याचे संरक्षण घेतात, पण ज्याने हे सर्व दिले, त्या व्यक्तीचे नाव घेताना त्यांना 'जात' आडवी येते. नाशिकसारख्या घटनांमधून हेच अधोरेखित होते की, आपण तंत्रज्ञानाने २१ व्या शतकात पोहोचलो असलो तरी मानसिकतेने अजूनही मध्ययुगीन आहोत.

बाबासाहेब हे कोणत्याही एका धर्माचे किंवा जातीचे 'खाजगी मालमत्ता' नाहीत. ते भारताचे अमूल्य रत्न आहेत. जर आपल्याला संविधानाचा अभिमान आहे, तर त्या संविधानाच्या निर्मात्याचाही अभिमान असायलाच हवा. फोटो लावणे किंवा न लावणे हा ज्याचा त्याचा प्रश्न असू शकतो, पण अंतःकरणात त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता असणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे.ज्या दिवशी आपण बाबासाहेबांना जातीच्या चौकटीतून बाहेर काढून 'राष्ट्राचा नायक' म्हणून स्वीकारू, त्याच दिवशी खऱ्या अर्थाने प्रजासत्ताक दिन साजरा झाल्यासारखे होईल

## क्षयरोगाच्या मुळापासून उच्चाटनासाठी समन्वयाने काम करा; जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे निर्देश

**आत्ताच एक्सप्रेस/जालना/प्रतिनिधी/** टीबीमुक्त भारत हे स्वप्न साकार करण्यासाठी जिल्ह्यात राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम प्रभावीपणे राबविला जात आहे. जिल्ह्यात क्षयरुग्णांचे प्रमाण आणि मृत्यूदर घटला असला तरी, या आजाराच्या समूळ उच्चाटनासाठी आरोग्य विभागाने अधिक जनजागृती करून सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित 'जिल्हास्तरीय टी.बी. फोरम' च्या बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. गोपाल कुडलीकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे यांच्यासह सर्व तालुक्यांचे आरोग्य अधिकारी व संबंधित यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते.दरवर्षी २४ मार्च रोजी डॉ. रॉबर्ट कॉक यांच्या स्मृतीप्रित्यर्थ 'जागतिक क्षयरोग दिन' साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. विशेषतः टीबीमुक्त ठरलेल्या ग्रामपंचायतींच्या १० सरपंचांचा या दिवशी विशेष सन्मान करून त्यांना प्रोत्साहित केले जाणार आहे.'प्रधानमंत्री टीबीमुक्त भारत' उपक्रमांतर्गत 'निक्षय मित्र' योजनेद्वारे क्षयरुग्णांना दानशूर व्यक्ती आणि संस्थांकडून मदत दिली जाते.२०२५ मधील कामगिरी: कलश सीड्स (६५०), जालना मार्केट कमिटी (२००) आणि गजलक्ष्मी स्टील (९०) यांच्या सहकार्याने ९४० पोषण किटचे वाटप करण्यात आले.

# ईपीएस- ९५ पेन्शनचा मुद्दा हाताळण्यास सरकार असमर्थ असेल; तर सरकारने स्वेच्छा मरणाची परवानगी द्यावी

वाढती महागाई,वाढता भ्रष्टाचार,वाढता औषधोपचार आणि वाढत्या प्रदूषणामुळे ढासळते आरोग्य यांनी ईपीएस-९५ पेंशन धारक अत्यंत त्रासलेला आहे.कारण अल्पशा पेंशनमध्ये पेन्शन धारक कोणतेही काम पूर्ण करूच शकत नाही.यावर सरकारने कानांवर हात ठेवले आहे व तोंडावर बोट ठेवले आहे यावरून स्पष्ट होते की, सरकारला ईपीएस ९५ पेंशन धारकांशी काहीही देणेघेणे नाही. त्यामुळे सरकारला विनंती आहे की,आपण जर या गंभीर समस्येवर तोडगा काढूच शकत नसेल तर स्वेच्छा मरणाची परवानगी दिली पाहिजे.याचे स्वागत आम्ही करू. गेल्या १२ वर्षांपासून ईपीएस पेंशन धारक मिनिमम (कमीत कमी) पेंशनची मागणी करीत आहे.या उद्देशाने कमीत कमी जगण्याइतकी तरी पेन्शन जाहीर करावी अशी पेंशनधारकांची केंद्र सरकारकडे अनेक वर्षांपासून मागणी करीत आहे.यावर लोकसभेत व राज्यसभेत अनेक खासदारांनी प्रश्न सुध्दा उपस्थित केले.सोबतच देशातील अनेक संघटनांनी मंत्री , खासदार,आमदार यांना निवेदनाच्या माध्यमातून सरकारपर्यत आपले प्रश्न मांडण्याचे काम केले.त्यामुळे या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सरकारच्या माध्यमातून ईपीएस-९५ बद्दल ठोस निर्णय घेऊन पेंशन धारकांना दिलासा देईल अशी आशा देशातील दिड करोड वृध्द पेंशन धारकांना वाटत होती.परंतु याही अर्थसंकल्पीय अधिवेशनात ईपीएस-९५ पेंशन धारकांच्या पदरी निराशाच आली ही अत्यंत दुःखद आणि चिंताजनक बाब आहे.अनेक वर्षांपासून पेंशन धारकांचा संघर्ष सुरूच आहे.लोकसभा निवडणुकीच्या आधी ईपीएस पेंशन धारकांबद्दल सरकारकडुन चांगली बातमी येण्याचे संकेत होते.परंतु सरकारने पेंशन धारकांच्या पदरी फक्त निराशा दिली.याचे दुःख करोडो वयोवृद्ध पेंशन धारकांना झाले.तरीही जगण्याइतकी पेंशन दिली पाहिजे याबद्दल अजून पर्यंत सरकारला जाग आलेला नाही.ईपीएस-९५ पेंशनचा मुद्दा कोणत्याही एका पक्षाचा,संघटनेचा किंवा संस्थेचा नसुन सार्वजनिक आहे. केंद्र सरकार मोठमोठ्या गोष्टी करत आहेत परंतु वृध्दांकडे पुर्णतः दुर्लक्ष करीत आहे. ईपीएस-९५ पेंशन धारकांना न्याय मिळेल या आशेने आतापर्यंत उम्मीद टीकुन होती.परंतु सरकार मिनिमम पेंशन बद्दल एकही शब्द बोलायला तयार नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे. ईपीएस-९५ पेन्शन बद्दल सरकार सोबत,मंत्र्यांसोबत व अनेक खासदारांसोबत चर्चा होवून सुध्दा सरकार पेन्शन धारकांवर अन्याय करतांना दिसते याचे जिवंत उदाहरण या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिसून आले. आज देशातील दिड करोड ईपीएस-९५ पेन्शन धारकांना कमीत कमी १००० व जास्तीत जास्त ३००० रूपयापर्यंत पेन्शन मिळत असल्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह होणे अत्यंत कठीण झाले आहे.कारण सरकारने महागाईचा मोठा डोंगर उभा केला आहे यात सर्वसामान्य व पेंशन धारक दबलेला आहे.यामुळे अल्पशा पेन्शनमध्ये पेन्शन धारक जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही.कारण खाण्यापिण्याचा खर्च, इलेक्ट्रीक बिल, पाण्याचे बिल,घरटॅक्स,वाढती महागाई, वयानुसार औषधोपचार इत्यादी अती आवश्यक सेवा १००० किंवा ३००० रूपयात कशाकाय पुर्ण होणार? हे गांभीर्य सरकारला का दिसत नाही? सरकार एवढी निर्लज्ज का झाली?पेंशन धारकांची मागणी होती की, कमीत कमी ७ हजार ५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता व वैद्यकीय सुविधा मिळावी. परंतु वित्त मंत्री निर्मला सिताराम यांनी संपूर्ण ईपीएस-९५ पेंशन धारकांना निराश केल्याचे स्पष्ट दिसून येते.ईपीएस पेन्शन धारकांचा मुद्दा अत्यंत गंभीर, महत्त्वाचा आणि ज्वलंत असल्याचे मी समजतो. हा ज्वलंत मुद्दा असल्याने याची दखल केंद्र सरकारने या अर्थसंकल्पीय अधिवेशनात घेणे गरजेचे होते. परंतु सरकारने याला यत्किंचितही महत्व दिले नाही ही अत्यंत दुःखद बाब आहे. वृद्धांच्या अडीअडचणी पाहून ईपीएस- १९९५ पेन्शन धारकांचा प्रश्न मार्गी लावायला पाहिजे होता परंतु सरकारने पेंशन धारकांना निराश केले.केंद्र सरकारने आतापर्यंत दिड करोड ईपीएस पेन्शन धारकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले. तरीही ६० ते ८०वर्षाच्या म्हाताऱ्या पेन्शन धारकांनी आतापर्यंत शांततेने आंदोलन केले आणि करीत आहे व जगण्याइतकी पेंशनच्या मागणीची आस लावून बसले होते. कारण पेन्शन ही त्यांच्या म्हारपणाची शीदोरी आहे. त्यामुळे पेन्शन हे जीवन-मरणाचे साधन सुध्दा आहे.याबाबदची सुध्दा सरकारने जान ठेवली नाही. सरकारने पेन्शन धारकांचा अंत न पाहता कोणत्याही योजनेअंतर्गत कमीत कमी ७५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता आणि वैद्यकीय सुविधा ताबडतोब लागु करण्याचा निर्णय आतातरी घ्यावा.आता पेन्शन धारकांच्या प्रश्नावर अंतिम निर्णय घेण्याची वेळ आली आहे.देशात अनेक कठीण प्रश्न आहेत यात दुमत नाही आणि सरकार यावर नेहमी तोडगा काढण्याचा प्रयत्न करीत असते.परंतु आज १४० कोटी जनता व राजकीय पुढारी उघडल्या डोळ्यांनी दिड कोटी पेन्शन धारकांच्या वेदना पाहात आहे व दिसत आहे.परंतु सरकार ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या बाबतीत चेहऱ्यावर पांघरूण घेऊन बसले आहे.सरकारच्या तिजोरीत कामगारांच्या घामाचा अरबो रूपया सरकारजवळ आहे हा पैसा सरकार लोकप्रतिनिधीच्या पगारासाठी,पेन्शनसाठी व इतरत्र वापरत असतो. परंतु सरकार कामगारांना पेन्शन देवतांना भिक दील्यासारखी पेंशन देत आहे. ही लोकशाहीला काळीमा फासणारी व घृणास्पद बाब आहे.याचे दुःख आपल्या पुर्वजांना सुध्दा होत असावे. राजकीय पुढाऱ्यांचे वाढीव पगार,इतर भत्ते व पेन्शन सुरळीत सुरू असतात व सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार वाढले की राजकीय पुढाऱ्यांचे पगार व पेंशन वाढतात याला काय म्हणावे?पेंशन धारकांच्या या घटनेवरून असे दिसुन येते की सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले की काय असे वाटत आहे. केंद्र सरकार पेन्शन धारकांना वाचवीण्यापेक्षा वाऱ्यावर सोडल्याचे काम करीत आहे. परंतु आताही वेळ गेलेली नाही देर आज दुरूस्त आए ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या मागणीवर सरकारने गांभीर्याने विचार करून अवश्य अंतीम निर्णय घेवून पेन्शन धारकांना दीलासा देवुन त्यांचा मार्ग मोकळा करावा. कारण ईपीएस-९५ पेन्शन धारक प्रत्येक अधिवेशनात पेन्शन वाढण्याची वाट पाहत असतो.परंतु नेहमी त्यांच्या नशिबी नीराशा लागते. ईपीएस पेन्शन धारकांनी गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत अनेक आंदोलने करून रस्त्यावर उतरले. तरीही सरकारचे डोळे उघडले नाही. म्हणजेच केंद्र सरकार ईपीएस-१९९५ पेन्शन धारकांबद्दल उदासीन असल्याचे दिसून येते. अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्थमंत्री निर्मला सीतारामन ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या जखमेवर फुंकर घालेल असे वाटत होते.परंतु सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले व निराशा हाती आली. ईपीएफओ चा पैसा हा राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्रात जात असतो. त्यामुळे ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांना न्याय देण्याचे काम व दायीत्व केंद्र सरकारचे असते तेवढेच राज्य सरकारचे सुध्दा असते.कारण देशाच्या विकासाकरिता संपूर्ण पैसा हा राज्य सरकारच्या तिजोरीतुन केंद्रात जात असतो.त्यामुळे कामगार व कर्मचाऱ्यांचा ईपीएफओने घेतलेला पैसा गेला कुठे? असाही प्रश्न दिड करोड पेन्शन धारकांपुढे उपस्थित आहे.त्यामुळे प्रत्येक राज्यातील कामगार व कर्मचारी विचारत आहे की पेन्शन करीता कापलेला पैसा गेला कुठे? ईपीएस १९९५ चे पेन्शन धारक आपल्या हक्काचा पैसा पेन्शनच्या स्वरूपात सरकारला मागत आहे.परंतु सरकार यावर मात्र मौन धारण केल्याचे दिसून येते. म्हणजेच आज पेन्शन धारकांची परीस्थिती अशी झाली आहे की आपलाच पैसा आपणच चोर. त्यामुळे ईपीएस १९९५ च्या पेन्शन धारकांसमोर प्रश्न आहे की जगावे की मरावेअशी गंभीर परिस्थिती आज ईपीएस पेन्शन धारकांची झाली आहे.त्यामुळे सरकारने ईपीएस पेन्शन धारकांना कमीत कमी ७५०० रूपये पेन्शन, महागाई भत्ता व इतर सुविधा लागू करून पेन्शन धारकांना योग्य न्याय सरकारने द्यावा. पेंशनधारक आशावादी आहेत. त्यामुळे पेन्शन धारकांना विश्वास आहे की ईपीएस १९९५ पेन्शन धारकांचा प्रश्न अवश्य सुटेल. पेंशन धारकांची ही लढाई अंतिम आहे. ईपीएस पेन्शन धारक चिंतेने मरत आहे, महागाई वाढत आहे, आर्थिक परिस्थिती नाजूक होत आहे.सुप्रिम कोर्टाचेही म्हणने आहे की ईपीएस पेन्शन धारकांना मीळणारी पेन्शन ही तुटपुंजी आहे.त्यामुळे जगण्याइतकी पेन्शन मिळायलाच पाहिजे. शेतकरी हा ज्याप्रमाने देशाचा अन्नदाता आहे त्याचप्रमाणे देशाचा कामगार हा शिल्पकार आहे याची जाण केंद्र सरकारने ठेवली पाहिजे.राजकीय पुढारी मोठ्या ऐटीने सांगतात की समान हक्क,समान न्याय, समान अधिकार मग ईपीएस पेन्शन धारकांच्या पेन्शनमध्ये व राजकीय पुढाऱ्यांच्या पेन्शन, पगार यात तफावत का? असाही प्रश्न सर्वसामान्यांसमोर उपस्थित होतो.केंद्र सरकारने ज्याप्रमाणे आठव्या वेतन आयोग स्थापनेला मंजुरी दिली.त्याचप्रमाणे ईपीएस-९५ पेंशन बद्दल सरकारने ठोस निर्णय घेतला पाहिजे. मी केंद्र सरकारला विनंती करतो की आपण अनेक योजना अंमलात आणल्यात त्याचे मनापासून स्वागत.परंतु २०१४ पासून प्रलंबित असलेला व लोकसभेत पक्ष-विपक्षाच्या अनेकदा खासदारांनी उचललेला ईपीएस-९५ चा पेंशनचा मुद्दाला गांभीर्याने घेऊन कमीत कमी ७५०० रूपये पेंशन जाहीर करून अवश्य मार्गी लावेल अशी आशा देशाच्या दिड करोड पेंशन धारकांना आहे.सरकारला यावर काहीच निर्णय घ्यायचा नसेल ईपीएस पेंशन धारकांना सरकारने स्वेच्छा मरणाची परवानगी द्यावी याचेही आम्ही स्वागत करू.जय हिंद!जय भारत.

**- लेखक,रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**

# राऊत हे 'उबाठा'चे प्रवक्ते की पवार-कॉंग्रेसचे दलाल? भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांचा घणाघाती सवाल

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/**संजय राऊत हे अधिकृतपणे उबाठा गटाचे प्रवक्ते म्हणून मिरवतात, पण त्यांची भाषा आणि कृती पाहता ते नेमके कोणाचे प्रवक्ते आहेत? ते शरद पवारांचे दलाल आहेत की कॉंग्रेस आणि डाव्या आघाडीचे हस्तक? असा जळजळीत सवाल भारतीय जनता पार्टीचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी उपस्थित केला आहे. भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना बन यांनी राऊतांच्या राजकीय भूमिकेचे वाभाडे काढले.

**राऊतांचे डोके डाव्यांकडे गहाण?**

संजय राऊत यांच्यावर टीका करताना नवनाथ बन म्हणाले की, राऊत हे उबाठा गटाचे खासदार असले तरी त्यांची प्रत्येक भूमिका ही शरद पवारांच्या हिताची असते. राऊतांचे दोन पाय शरद पवार गटात आहेत, हात कॉंग्रेसमध्ये अडकले आहेत; अशा परिस्थितीत उबाठा गटामध्ये त्यांचे डोके तरी शिल्लक आहे का? की त्यांनी आपले डोके डाव्या आघाडीकडे गहाण ठेवले आहे? असा बोचरा सवाल त्यांनी केला. दुसऱ्यांच्या पक्षांत नाक खुपसण्यापेक्षा राऊतांनी आपल्या उरल्यासुरल्या संघटनेकडे लक्ष द्यावे, असा टोलाही त्यांनी लगावला.

**'डोमकावळ्यांपासून सावध राहा' - राष्ट्रवादीला इशारा**

अजितदादांच्या निधनानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेसचा ताबा मिळवण्यासाठी काही 'डोमकावळे' टपून बसले आहेत आणि त्यातील प्रमुख नाव संजय राऊत आहे, असा खळबळजनक आरोप बन यांनी केला. राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचा किंवा एकत्र येण्याचा निर्णय घेण्याचा अधिकार केवळ उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांना आहे. त्या पक्षाच्या सर्वेसर्वा आहेत आणि त्यांच्या निर्णयाला भाजपचा पूर्ण पाठिंबा असेल. मात्र, पक्षाचा घास घेू पाहणाऱ्या राऊतांसारख्या लोकांपासून राष्ट्रवादीने सावध राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

**प्रफुल्ल पटेलांवरील टीकेला प्रत्युत्तर**

प्रफुल्ल पटेल यांच्यावर टीका करणाऱ्या राऊतांना सुनावताना बन म्हणाले की, पटेल हे महाराष्ट्राला पटेल अशी समतोल भूमिका घेत आहेत. राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून अनेकांनी पक्षहितासाठी काम केले, पण आज राऊत केवळ राजकारण करण्यासाठी पटेलांच्या नावावर आक्षेप घेत आहेत. राऊतांनी इतरांच्या पायाकडे पाहण्यापेक्षा स्वतःच्या अधोगतीकडे पाहावे.

**उबाठा आणि रोहित पवारांवर निशाणा**

उबाठा गटाची वाताहत: महापालिका निवडणुकीत जनतेने उबाठा गटाला त्यांची जागा दाखवून दिली असून अनेक ठिकाणी त्यांचे संघटनही उरलेले नाही.रोहित पवारांवर आरोप: कर्जत-जामखेडमध्ये जनतेने रोहित पवारांना नाकारले होते. केवळ पैशांचा वापर करून त्यांनी निवडणूक जिंकली, अन्यथा त्यांचा पराभव निश्चित होता.

**जागतिक पातळीवर देशाची बदनामी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत-अमेरिका व्यापार करार हा देशाचा मोठा विजय आहे. मात्र, संजय राऊत हे राहुल गांधींची भाषा वापरून जागतिक स्तरावर भारताची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करत आहेत. देशाचा अपमान करणाऱ्यांना जनता कधीही माफ करणार नाही, असा इशारा नवनाथ बन यांनी दिला.




## मराठी नाट्यकलेचा अभिमानास्पद आविष्कार: 'निळी टोपी' नाटकातून सामाजिक क्रांतीचे जिवंत दर्शन

**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर/प्रतिनिधी/**मराठी रंगभूमीवर आजवर अनेक प्रयोग झाले, मात्र मानवी मनाच्या आणि हृदयाच्या संवेदनांना थेट हात घालणारे 'निळी टोपी' हे नाटक मराठी नाट्यकलेचा एक सर्वोत्कृष्ट आविष्कार ठरत आहे. भारतीय समाजव्यवस्थेतील दाहक वास्तव आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांतून घडलेली क्रांती यांचा एक अंगावर शहारे आणणारा प्रवास या नाटकातून मांडण्यात आला आहे.

**अस्पृश्यतेच्या वेदनेचा वास्तव प्रवास**

शेकडो वर्षांपासून मागासवर्गीय समाजाला दिली गेलेली अमानवीय वागणूक, 'वाढ ये माय...', 'शिळं-उष्टं' मागण्याची वेळ आणि 'मालक...' म्हणत झुकलेले ते खांदे; या सर्व प्रसंगांनी प्रेक्षकांच्या डोळ्यांत अश्रू उभे केले. हे नाटक केवळ मनोरंजन करत नाही, तर संवेदनशील नागरिकाला आत्मपरीक्षण करायला भाग पाडते, अशी प्रतिक्रिया देगलूर महाविद्यालयाचे लोकप्रशासन विभागप्रमुख प्रा. डॉ. बालाजी कतुरवार यांनी व्यक्त केली आहे.

**संघर्षाकडून सन्मानाकडे: एक ऐतिहासिक मांडणी**

प्राचीन काळातील आर्य-नाग करार असो वा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मूलमंत्र; या प्रवासाचे प्रभावी सादरीकरण दिग्दर्शक राहुल जोंधळे यांनी केले आहे. २१ व्या शतकात मागासवर्गीय समाज मुख्य प्रवाहात सन्मानाने कसा उभा राहिला, याची उत्तम मांडणी यात दिसून येते.

प्रेरणादायी संदेश: 'पाया पडण्यापेक्षा विचार डोक्यात घ्या'

नाटकातील एक प्रसंग विशेष लक्षवेधी ठरला. बाबासाहेबांच्या पाया पडणाऱ्या अनुयायाला बाबासाहेबांनी मारलेली जरब आणि माझ्या पाया पडण्यापेक्षा माझे विचार डोक्यात घ्या, शिक्षणाची कास धरा हा दिलेला संदेश आजच्या तरुणाईला नवी दिशा देणारा आहे.

देगलूरच्या विद्यार्थ्याचा कलाविष्कार

या नाटकात देगलूर महाविद्यालयाचा विद्यार्थी कपिल कांबळे (गुडसूरकर) याने विशेष भूमिका साकारली आहे. आपल्या विद्यार्थ्याचा हा उत्तुंग कलाविष्कार पाहून प्राध्यापक म्हणून अभिमान वाटत असल्याचे डॉ. कतुरवार यांनी नमूद केले.

**चित्रपटाची अपेक्षा आणि भविष्यातील वाटचाल**

नांदेडच्या कलाकारांनी सादर केलेल्या या नाटकाचे प्रयोग संपूर्ण भारतभर होणे आवश्यक आहे. या नाटकाची कथा आणि मांडणी इतकी सशक्त आहे की, लवकरच यावर आधारित एक दर्जेदार मराठी आणि हिंदी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येईल, असा विश्वास डॉ. कतुरवार यांनी व्यक्त केला.

लेखक आणि दिग्दर्शक राहुल दि. जोंधळे यांच्या कल्पकतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# राजकीय टीकेसाठी गंभीर गुन्हे दाखल करणे म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी

आत्ताच एक्सप्रेस

मुंबई/प्रतिनिधी/केवळ राजकीय नेत्यांवर टीका केली म्हणून एखाद्या व्यक्तीवर गंभीर आणि अजामीनपात्र गुन्हा दाखल करणे, तसेच त्यांना देशाबाहेर जाण्यापासून रोखण्यासाठी 'लूक आऊट सर्क्युलर' (ङजउ) जारी करणे, हा कायद्याचा सरळसरळ दुरुपयोग आहे. अशा शब्दांत नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश एस. धनावत यांनी आपली भूमिका मांडली आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप नेत्यांविरोधात समाज माध्यमांवर आक्षेपार्ह पोस्ट केल्याच्या आरोपावरून डॉक्टर आणि युट्युबर डॉ. संग्राम पाटील यांच्यावर झालेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हे मत व्यक्त केले. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणात महाराष्ट्र सरकारला नोटीस बजावून उत्तर मागितल्याने राज्य सरकारच्या भूमिकेवर आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

काय आहे संपूर्ण प्रकरण?

डॉ. संग्राम पाटील हे भारतीय वंशाचे ब्रिटिश नागरिक असून ते पेशाने डॉक्टर आणि प्रसिद्ध समाज माध्यम चित्रफीतकार आहेत. १० जानेवारी रोजी ते मुंबईत आले होते. मात्र, १९ जानेवारीला जेव्हा ते लंडनला परतण्यासाठी विमानतळावर पोहोचले, तेव्हा त्यांना रोखण्यात आले. त्यांच्याविरुद्ध 'शोध सूचनापत्र' जारी असल्याचे सांगत त्यांना प्रवासापासून मज्जाव करण्यात आला.

भाजपच्या माध्यम कक्षाचे प्रमुख निखिल भामरे यांनी १८ डिसेंबर २०२५ रोजी डॉ. पाटील यांच्या विरोधात एन. एम. जोशी मार्ग पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती.डॉ. पाटील यांनी सोशल मीडियावरून भाजप आणि प्रमुख नेत्यांविषयी हेतुपुरस्सर चुकीची माहिती पसरवून समाजात शत्रुत्व निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.या तक्रारीवरून पोलिसांनी त्यांच्यावर भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम ३५३(२) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे, जो अतिशय गंभीर आणि अजामीनपात्र स्वरूपाचा आहे.

या प्रकरणावर बोलताना धनावत म्हणाले की, सरकारवर टीका करणे हा लोकशाहीत नागरिकांचा अविभाज्य हक्क आहे. केवळ राजकीय मतभेद आहेत म्हणून अशा कठोर कलमांचा वापर करणे, हे संविधानाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर थेट हल्ला आहे. कायद्याचा वापर राजकीय सूडबुद्धीने किंवा कोणाला त्रास देण्यासाठी होणे लोकशाहीसाठी घातक आहे.

उच्च न्यायालयाचा हस्तक्षेप आणि दिलासा

डॉ. संग्राम पाटील यांनी ज्येष्ठ विधिज्ञ सुदीप पासबोला यांच्यामार्फत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेत त्यांनी आपल्यावरील गुन्हा आणि 'लूक आऊट सर्क्युलर' रद्द करण्याची मागणी केली आहे. प्रकरणाचा तपास थांबवून आपल्याला त्वरित इंग्लंडला परत जाण्याची परवानगी देण्याची विनंती केली आहे.यावर सुनावणी करताना न्यायमूर्ती अश्विन भोबे यांच्या खंडपीठाने महाराष्ट्र सरकारला नोटीस बजावली आहे. न्यायालयाने घेतलेल्या या भूमिकेचे ड. धनावत यांनी स्वागत केले असून, यामुळे तपास यंत्रणांच्या अमर्याद अधिकारांवर न्यायालयीन अंकुश राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

डॉ. पाटील यांनी २१ जानेवारी रोजी पोलिसांसमोर आपला जबाब नोंदवला आहे. मात्र, अद्याप त्यांना मायदेशी परतण्याची परवानगी मिळालेली नाही. या प्रकरणाची पुढील सुनावणी याच महिन्यात होणार आहे. एका सुदृढ लोकशाहीत प्रश्न विचारणाऱ्यांचा आवाज दाबणे चुकीचे आहे. उच्च न्यायालयाचा आगामी निर्णय देशातील अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या भवितव्यासाठी नक्कीच दिशादर्शक ठरेल, असेही ड. धनावत यांनी नमूद केले.

## जालना जिल्हा कॉपीमुक्तीसाठी पोलिसांची भुमिका महत्वाची

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** जिल्ह्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (बारावी) दि.१० फेब्रुवारी ते दि.१८ मार्च २०२६ तर माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (दहावी) दि.२० फेब्रुवारी ते दि.१८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्यात इयत्ता बारावीच्या परीक्षेसाठी ३७ हजार ३३८ विद्यार्थ्यांसाठी ७९ परीक्षा केंद्र आहेत. इयत्ता दहावीच्या परीक्षेसाठी ३२ हजार ४३३ विद्यार्थ्यांसाठी १०२ परीक्षा केंद्र आहेत. सर्व परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या देखरेखीखाली होणार असून जिल्ह्यातील संवेदनशील बारावीच्या ८ तर दहावीच्या ४ अशा एकुण १२ परीक्षा केंद्रावर ड्रोन कॅमेऱ्याची नजर राहणार असून चित्रीकरणही करण्यात येणार आहे. जालना जिल्ह्यातील दहावी, बारावीच्या परीक्षा भयमुक्त वातावरणात व पारदर्शक होणे गरजेचे असल्याने जालना जिल्हा कॉपी मुक्तीसाठी पोलिस विभागाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे, तरी जिल्ह्यातील संवेदनशिल परीक्षा केंद्रावर चोख पोलिस बंदोबस्त ठेवून गैरप्रकाराला आळा घालावा.

# मराठी भाषेतून ज्ञानसाधनांची निर्मिती काळाची गरज: जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** विविध ज्ञानशाखांचे उच्चशिक्षण आपण इंग्रजी भाषेतून घेत असतो, मात्र या ज्ञानाची साधने आपल्या मातृभाषेत म्हणजेच मराठीत उपलब्ध असणे आवश्यक आहे.

सर्व विद्याशाखांचे ज्ञान मराठीत आणून विश्वकोशासारख्या समृद्ध ज्ञानसाधनांची निर्मिती करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या वतीने शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयात आयोजित 'वनस्पतीविज्ञान आणि भौतिकविज्ञान' नोंदलेखन कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

**इंटरनेटच्या युगात 'विश्वकोश' हेच विश्वसनीय साधन**

आजच्या इंटरनेट आणि माहिती तंत्रज्ञानाच्या युगावर भाष्य करताना जिल्हाधिकारी म्हणाले की, सध्या माहितीचे अनेक स्रोत उपलब्ध आहेत, परंतु त्यातील माहिती किती अधिकृत आहे हे तपासणे महत्त्वाचे ठरते.अधिकृतता: विश्वकोश हे ज्ञानप्राप्तीचे सर्वात विश्वासार्ह आणि अधिकृत साधन आहे.

**अद्यावतीकरण:** ज्ञानाला संशोधनाचा आधार असावा लागतो. नवनवीन संकल्पना, शोध आणि बदलत्या संदर्भांनुसार हे ज्ञान सातत्याने अद्यावत करणे गरजेचे आहे.

**वैचारिक प्रगती:** ज्ञान हे मानवी बुद्धीला चालना देण्याचे कार्य करते, त्यामुळे ते सर्वसामान्यांना समजेल अशा मराठी भाषेत उपलब्ध करून देणे ही मोठी ज्ञानसाधना आहे.

या कार्यशाळेचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. पंकजा वाघमारे होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर खालील मान्यवरांची



उपस्थिती होती.डॉ. मिलिंद दुसाने (जिल्हा माहिती अधिकारी),विजय लाळे (निवृत्त शास्त्रज्ञ, होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र),डॉ. राजेंद्र सातपुते (संचालक, शासकीय विज्ञान संस्था),डॉ. अशोक चव्हाण (माजी विभागप्रमुख, वनस्पतीशास्त्र विभाग, डॉ. बा.आ.म. विद्यापीठ) तसेच प्रा. अरविंद धाबे, डॉ. नवल थोरात, डॉ. बी.बी. राजेशेख, डॉ. सुलोचना राठोड आणि विश्वकोश मंडळाचे सहायक रवींद्र घोडराज व डॉ. स्नेहा खोब्रागडे. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. पंकजा वाघमारे यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रुपेश मडकर यांनी केले, तर डॉ. सुहासिनी गेडेकर यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले. या कार्यशाळेच्या माध्यमातून वनस्पतीविज्ञान आणि भौतिकविज्ञानातील क्लिष्ट संकल्पना मराठीत सोप्या पद्धतीने मांडण्यासाठी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले.

# जोडबोरसर नगरीत ह.भ.प. प्रसाद महाराज अंमळनेरकर यांचे भव्य स्वागत

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड (प्रतिनिधी-उदय कुलकर्णी)** तालुक्यातील जोडबोरसर खुर्द नगरीमध्ये अध्यात्माचे चैतन्य पसरले आहे. अमळनेर येथील विठ्ठल-रुक्मिणी संस्थानाचे सर्वेसर्वा ह.भ.प. प्रसाद महाराज यांचे मंगळवारी (दि. ३) सायंकाळी गावात आगमन झाले. यावेळी ग्रामस्थांनी आणि पंचक्रोशीतील भाविकांनी त्यांचे अभूतपूर्व व उत्साही स्वागत केले.भजनी मंडळांकडून जयघोष महाराजांचे आगमन होताच श्री पूर्णर्ती दत्त भजनी मंडळ, विठ्ठल पंथी भजनी मंडळ, सतिमाता उत्सव मंडळ तसेच गावातील शेकडो शिष्यगणांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी 'हनुमान की जय', 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' आणि 'पुंडलिक वरदे हरी विठ्ठल' अशा गगनभेदी जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

**हनुमान मंदिर जीर्णोद्धार व मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा उत्साह**





जीर्णोद्धार व प्राणप्रतिष्ठा सोहळा दिनांक ४ फेब्रुवारी ते ६ फेब्रुवारी या कालावधीत जोडबोरसर येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा ह.भ.प. प्रसाद महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होत आहे. या उत्सवामध्ये हनुमान मूर्तीसह इतर देवतांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा आणि कलश रोपण सोहळा पार पडणार आहे. या नियोजित सोहळ्याच्या पूर्वतयारीची पाहणी करण्यासाठी महाराजांचे गावात आगमन झाले.

भक्तिमय वातावरण महाराजांनी तीन दिवसीय उत्सवाच्या तयारीची पाहणी केल्यानंतर सायंकाळी हरिनामाचा गजर केला. या संकीर्तनात गावातील आबालवृद्ध आणि पंचक्रोशीतील असंख्य भक्तगण तल्लीन झाले होते. महाराजांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण गावात आनंदाचे आणि भक्तीचे वातावरण निर्माण झाले असून, उत्सवासाठी ग्रामस्थ मोठ्या उत्साहाने सहभागी झाले आहेत.

# पंकजाताईंच्या झंझावातापुढे विरोधक गारद

## चौकयामध्ये 'आप'ला भगदाड, कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश!

**आत्ताच एक्सप्रेस**
**चौका (प्रतिनिधी)** राज्याच्या पशुधन व पर्यावरण मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री, लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या विचारांचा वारसा चालवणाऱ्या रणरागिनी पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत चौका येथे राजकीय भूकंपाचे धक्के बसले आहेत. पंकजाताईंच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत आम आदमी पक्षासह इतर संघटनांच्या असंख्य कार्यकर्त्यांनी आज 'कमळ' हाती घेतले.

**बड्या नेत्यांची भाजपमध्ये एन्ट्री**

चौका येथे आयोजित जाहीर सभेत पंकजाताई मुंडे यांच्या आक्रमक शैलीने आणि विकासकामांच्या धडाक्याने प्रभावित होऊन अनेक दिग्गज नेत्यांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. यामध्ये प्रामुख्याने संतोष वाघ (सरपंच, चौका),जालिंदरनाथ ढाकणे (आम आदमी पार्टीचे माजी सहसंयोजक),गणेश मंडलिक,

पंढरीनाथ वाघ (सोसायटी संचालक), गोरख वाघ व पंडित भोसले यांच्यासह शेकडो





कार्यकर्त्यांनी पंकजाताईंच्या हस्ते भाजपचा दुपट्टा परिधान करून अधिकृत प्रवेश केला.

**पंकजाताईंचा विरोधकांना इशारा**

यावेळी बोलताना पंकजाताई मुंडे यांनी आपल्या खास शैलीत विरोधकांचा समाचार घेतला. त्या म्हणाल्या, हा जनसागर सांगतोय की जनतेला केवळ विकास आणि शब्द पाळणारे नेतृत्व हवे आहे. भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचा सन्मान राखला जाईल आणि चौका परिसराच्या विकासासाठी आपण कटिबद्ध आहोत.

**गावागावात भाजपचे वर्चस्व**

सरपंच संतोष वाघ आणि जालिंदरनाथ ढाकणे यांच्या भाजप प्रवेशामुळे स्थानिक राजकारणाची गणिते पूर्णपणे बदलली आहेत.

आम आदमी पक्षाच्या गोटात यामुळे मोठी शांतता पसरली असून, आगामी काळात पंकजाताईंच्या नेतृत्वाखाली भाजप जालना जिल्ह्यात अधिक मजबूत होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

# छत्रपती संभाजीनगरच्या नर्मदेश्वर मंदिरात महाशिवरात्रीचा अभूतपूर्व सोहळा

**शिवभक्तीचा महाकुंभ!**

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** सृष्टीचा नियंता, देवाधिदेव महादेव आणि शक्तीच्या मिलनाचा महापर्व म्हणजे 'महाशिवरात्री'. या मंगलमयी दिनाचे औचित्य साधून सिडको, एन-५ येथील श्री नर्मदेश्वर महादेव मंदिर येथे यंदा भव्य आध्यात्मिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी होणारा हा सोहळा केवळ धार्मिक विधीपुरता मर्यादित नसून, शिवतत्वाच्या जागृतीचा एक महाकुंभ ठरणार आहे.

आध्यात्मिक ऊर्जेचा महाविस्फोट

महाशिवरात्रीच्या रात्री शिवतत्व पृथ्वीच्या अत्यंत जवळ असते, असे शास्त्र सांगते. याच ऊर्जेचा लाभ सर्व भाविकांना मिळावा, यासाठी 'नर्मदेश्वर महादेव मंदिर ट्रस्ट'ने जय्यत तयारी केली आहे. अंधाराकडून प्रकाशाकडे नेणाऱ्या या प्रवासात हजारो भाविक सहभागी होऊन शिवनामाचा गजर करणार आहेत.

**महोत्सवाची प्रमुख आकर्षणे:** यावर्षीचा उत्सव विशेष करण्यासाठी आयोजकांनी खालील कार्यक्रमांची आखणी केली आहे:

**भक्तीची मेजवानी:** सुप्रसिद्ध भजन गायक श्री. अरविंद पिंगळे यांच्या सुमधुर आवाजात 'भजन संध्या' रंगणार आहे. त्यांच्या शिवभक्तीने संपूर्ण परिसर मंत्रमुग्ध होईल.

**डिजिटल दर्शन:** ईशा फाउंडेशनचे सद्गुरू यांच्या जगप्रसिद्ध महाशिवरात्री उत्सवाचे भव्य स्क्रीनवर थेट प्रक्षेपण (Live Screening) करण्यात येणार आहे. घराबाहेर राहूनही जागतिक स्तरावरील या साधनेत सहभागी होण्याची ही सुवर्णसंधी आहे.

**महाप्रसाद:** दिवसभर भाविकांसाठी शुद्ध आणि सात्विक महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

**आयोजक आणि पाठबळ**-या भव्य कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नर्मदेश्वर महादेव मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष नितेश गुप्ता यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण कार्यकारिणी अहोरात्र परिश्रम घेत आहे.

### महादेवाच्या चरणी लीन होऊया!

दिनांक: १५ फेब्रुवारी २०२६ स्थळ: श्री नर्मदेश्वर महादेव मंदिर, एन-५ गुलमोहर कॉलनी, सिडको, छत्रपती संभाजीनगर.या महाशिवरात्रीला केवळ उपवास नको, तर शिवरायांच्या भक्तीत स्वतःला झोकून देऊया! प्रत्येक शिवभक्ताने या आध्यात्मिक सोहळ्याचा साक्षीदार व्हायलाच हवे. **हर हर महादेव!**



अध्यक्ष नितेश गुप्ता, उपाध्यक्ष प्रसन्न डमरे, सचिव मनोहर भामरे, कोषाध्यक्ष अरविंद पिंगळे, या सोहळ्याला परशुराम ज्वेलर्स आणि स्वामी समर्थ कन्स्ट्रक्शन यांचे मोलाचे प्रायोजकत्व लाभले आहे. निखिल कोळस, जयंत बडवे, शुभम भामरे यांच्यासह सर्व कार्यकारी सदस्यांनी शहरांतील शिवभक्तांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# ७५ वर्षीय बेवारस वृद्धाचा उपचारादरम्यान मृत्यू; नातेवाईकांचा शोध सुरू

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर/ विशेष प्रतिनिधी**/येथील घाटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या एका ७५ वर्षीय अनोळखी वृद्धाचा मृत्यू झाला असून, अद्याप या मृतदेहाची ओळख पटलेली नाही. प्रशासनाकडून या व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, २३ ऑक्टोबर २०२५ रोजी रुग्णवाहिका चालक फहीमखान यांनी एका वृद्ध इसमास गंभीर अवस्थेत घाटी रुग्णालयात दाखल केले होते. या वृद्धाची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांच्यावर तातडीने औषधोपचार सुरू करण्यात आले. मात्र, दुर्दैवाने उपचारांना प्रतिसाद न मिळाल्याने दुसऱ्याच दिवशी, २४ ऑक्टोबर रोजी या इसमाचा मृत्यू झाला.टवण्यासाठी पोलिसांनी खालीलप्रमाणे वर्णन प्रसिद्ध केले आहे.

# शांती नर्सिंग होम येथे 'माणुसकीचा सोहळा' संपन्न; हंस फाउंडेशनचे अध्यक्ष माऊली दोबोले यांचा गौरव

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** समाजात माणुसकी, सेवा आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या व्यक्तींचा सन्मान होणे ही काळाची गरज आहे. अशा व्यक्तींच्या कार्यामुळेच समाजाला नवी दिशा मिळते आणि ते इतरांसाठी प्रेरणादायी ठरतात, असे प्रतिपादन मान्यवरांनी केले. कांचनवाडी येथील शांती नर्सिंग होम येथे आयोजित 'माणुसकीचा सोहळा' या कार्यक्रमात आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशिक्षक तथा हंस फाउंडेशनचे अध्यक्ष माऊली दोबोले यांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला.

**दिग्गजांची उपस्थिती आणि कौतुकाची थाप**

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आदर्श गाव पाटोदाचे माजी सरपंच भास्करराव पेरे पाटील आणि आरोग्य सेवा सहसंचालक तथा जिल्हा रुग्णालयातील मनोचिकित्सा विभाग प्रमुख डॉ. जितेंद्र डोंगरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी माऊली दोबोले यांच्या बहुआयामी कार्याचा गौरव केला. सामाजिक, शैक्षणिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात त्यांनी दिलेल्या योगदानाची प्रशंसा करताना पाहुण्यांनी नमूद केले की, माऊली दोबोले यांनी विविध सामाजिक उपक्रम आणि जनजागृतीच्या माध्यमातून समाजमन



घडवण्याचे मोलाचे कार्य केले आहे.

**सन्मान हा जबाबदारीची जाणीव करून देणारा - माऊली दोबोले**

सत्काराला उत्तर देताना माऊली दोबोले भावूक झाले होते. ते म्हणाले की, मिळालेला हा सन्मान म्हणजे माझ्या एकट्याचा गौरव नसून माझ्यासोबत काम करणाऱ्या प्रत्येक हाताचा सन्मान आहे. हा सोहळा मला समाजासाठी अधिक जोमाने आणि निष्ठेने काम करण्याची प्रेरणा देणारा आहे. माणुसकी, सेवा आणि सद्भाव जपणे यातच जीवनाचे खरे समाधान आहे. शांती नर्सिंग होमच्या वतीने आयोजित या 'व्यासपीठावर मित्रांचा सत्कार' या उपक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमाला शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, दोबोले यांचा मित्रपरिवार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शांती नर्सिंग होमच्या टीमने परिश्रम घेतले.

**वृत्त संकलन: गणेश सपकाळ,**

# पैठण येथे संत शिरोमणी नरहरी महाराज यांची ७४० वी पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**
**पैठण/प्रतिनिधी/बबन उदावंत/** भक्ती आणि कर्म यांचा सुवर्णसंगम घडविणारे, सुवर्णकार समाजाचे आराध्य दैवत संत शिरोमणी श्री नरहरी महाराज यांची ७४० वी पुण्यतिथी पैठण येथे अत्यंत मंगलमय वातावरणात आणि उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

धार्मिक विधी आणि पूजन



कार्यक्रमाची सुरुवात संत नरहरी महाराज यांच्या प्रतिमेच्या षोडशोपचार पूजनाने झाली. यावेळी महाराजांच्या मूर्तीवर अभिषेक करण्यात आला. विधीवत पूजन झाल्यानंतर उपस्थित भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. यावेळी संपूर्ण परिसर भक्तीमय वातावरणाने भारावून गेला होता.

भोजनदान आणि सामाजिक उपक्रम

पुण्यतिथीचे औचित्य साधून महाप्रसादाचे (भोजनदान) आयोजन करण्यात आले होते. 'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुला' या संतांच्या शिकवणीनुसार मोठ्या संख्येने भाविकांनी या प्रसादाचा लाभ घेतला.

याप्रसंगी बोलताना विलास बेद्रे यांनी भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले की, संत नरहरी महाराज हे केवळ सुवर्णकार समाजाचेच नव्हे तर संपूर्ण वारकरी संप्रदायाचे भूषण आहेत. त्यांनी आपल्या व्यवसायातूनच ईश्वराची भक्ती कशी करावी, याचा आदर्श घालून दिला आहे. सुवर्णकार समाज त्यांच्या विचारांचा कायम ऋणी राहील.

हा सोहळा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी परिसरातील मान्यवर व समाजबांधवांनी विशेष परिश्रम घेतले. यामध्ये प्रामुख्याने प्रल्हाद बेद्रे,विलास बेद्रे,ऋषिकेश बेद्रे,अशोक डहाळे,रुद्रा उदावंत,बाळू दहिवाळ यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा मोलाचा सहभाग होता. कार्यक्रमाच्या शेवटी सामूहिक आरती करून सांगता करण्यात आली.

# कॅन्सर रुग्णांना फळवाटप आणि मायेचा आधार; 'व्हॉईस ऑफ मीडिया'चा स्तुत्य सामाजिक उपक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/**कर्करोग (कॅन्सर) हा केवळ शारीरिक व्याधी नसून, त्याविरुद्ध लढण्यासाठी रुग्णाला मोठ्या मानसिक धैर्याची गरज असते. हेच धैर्य आणि सामाजिक बांधिलकी जपत, 'व्हॉईस ऑफ मीडिया' संघटनेच्या वतीने जागतिक कॅन्सर दिनाचे औचित्य साधून आमखास मैदान येथील कॅन्सर हॉस्पिटलमध्ये रुग्णांना फळवाटप करण्यात आले. तुम्ही या लढाईत एकटे नाही, समाज तुमच्या सोबत आहे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

सकारात्मकतेची शिदोरी आणि पौष्टिक आहार

आज दुपारी ५ वाजता संपन्न झालेल्या या उपक्रमात रुग्णालयातील विविध कक्षात उपचार घेणाऱ्या रुग्णांना ताजी आणि पौष्टिक फळे वितरित करण्यात आली. कॅन्सरसारख्या आजारात औषधांसोबतच संतुलित आहार आणि सकारात्मक वातावरणाची भूमिका कळीची असते. हीच गरज ओळखून व्हॉईस ऑफ मीडियाने हा उपक्रम उत्साहात राबविला.

अब्दुल कय्यूम (प्रदेशाध्यक्ष, सा.वी. विभाग): वैद्यकीय उपचारांना जेव्हा आपुलकीची जोड मिळते, तेव्हा रुग्ण लवकर बरा होतो. त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणे आणि त्यांना मानसिक बळ देणे हाच आमचा प्रामाणिक उद्देश आहे. भविष्यातही आमची संघटना अशी सामाजिक कर्तव्ये पार पाडत



राहील.डॉ. शेख शकील (जिल्हाध्यक्ष): कॅन्सरला घाबरण्याऐवजी वेळेवर तपासणी आणि उपचारांवर भर दिला पाहिजे. योग्य जनजागृती झाल्यास या आजारावर मात करणे शक्य आहे.

साजीद मौलाना (ज्येष्ठ समाजसेवक): रुग्णांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे. या हॉस्पिटलचे डीन डॉ. गायकवाड आणि त्यांचा कर्मचारी वर्ग अत्यंत कौतुकास्पद सेवा देत आहेत. सर्व रुग्ण लवकर बरे व्हावेत, हीच प्रार्थना.यावेळी ज्येष्ठ समाजसेवक साजीद मौलाना, प्रदेशाध्यक्ष अब्दुल कय्यूम, जिल्हाध्यक्ष डॉ. शकील शेख यांच्यासह इसाक शेख, अनिस रामपुरे, रमेश जाबा, संजय हिंगोलीकर, गणेश पवार तसेच 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे पदाधिकारी, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.मानवतेच्या भावनेतून राबवण्यात आलेल्या या उपक्रमाचे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांनी आभार मानले असून, शहरात या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मतदानासाठी कामगारांना मिळणार 'पेड लीव्ह'; प्रशासनाचा कडक इशारा

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/**
जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या दिवशी मतदारांना आपला मतदानाचा हक्क निर्विघ्नपणे बजावता यावा, यासाठी सर्व कामगार, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना भरपगारी सुटी (झरळव केश्रळवरू) देण्याचे आदेश कामगार उप आयुक्त नितीन पां. पाटणकर यांनी दिले आहेत.

**कोणाला मिळणार सुटी?**

ही सुटी केवळ सरकारी कार्यालयांपुरती मर्यादित नसून, खाजगी क्षेत्रातील सर्व आस्थापनांना लागू असेल.खाजगी कंपन्या आणि आयटी (IT) पार्क्स: माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील सर्व कंपन्या.व्यापारी प्रतिष्ठाने: सर्व दुकाने, शॉपिंग सेंटर्स, मॉल्स आणि रिटेलर्स,हॉस्पिटॅलिटी क्षेत्र: हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, खाद्यगृहे आणि निवासी लॉज,मनोरंजन व इतर: नाट्यगृहे, औद्योगिक उपक्रम आणि इतर सर्व खाजगी आस्थापना,महत्त्वाची बाब: जर एखादा कामगार कामाच्या निमित्ताने निवडणूक क्षेत्राबाहेर कार्यरत असेल, तरीही त्याला मतदानासाठी सुटी मिळणे हा त्याचा कायदेशीर हक्क आहे.

पूर्ण दिवस सुटी शक्य नसेल तर?

काही अपवादात्मक परिस्थितींमध्ये जिथे पूर्ण दिवस सुटी देणे शक्य नाही, तिथे संबंधित मालकांनी कामगारांना मतदानासाठी कमीतकमी २ ते ३ तासांची विशेष सवलत देणे बंधनकारक आहे.

मात्र, यासाठी प्रशासनाची पूर्वपरवानगी आणि सबळ कारण असणे आवश्यक आहे. ज्या आस्थापना कामगारांना सुटी देण्यास नकार देतील किंवा त्यांच्या पगारातून कपात करतील, त्यांच्यावर शासन परिपत्रकातील तरतुदींनुसार कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**तक्रारीसाठी 'दक्षता कक्ष' सज्ज**

जर एखाद्या कामगाराला मतदानासाठी सुटी किंवा सवलत नाकारण्यात आली, तर त्यांना थेट प्रशासनाकडे तक्रार करता येईल. यासाठी छत्रपती संभाजीनगर कामगार उप आयुक्त कार्यालयात 'दक्षता कक्ष' स्थापन करण्यात आला आहे.

संपर्क क्रमांक: ०२४०-२३३४६०३

कोणी संपर्क साधावा: संबंधित कामगार किंवा कामगार संघटना.मतदान हा आपला हक्क आणि कर्तव्य दोन्ही आहे. ७ फेब्रुवारी रोजी बाहेर पडा आणि लोकशाही बळकट करण्यासाठी आपले मत नोंदवा!

# राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय समन्वय समितीची बैठक संपन्न

**जालना (प्रतिनिधी)** राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय समन्वय समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षेत संपन्न झाली.बैठकीत जिल्हाधिकारी मित्तल म्हणाल्या की, तंबाखूमुक्त तसेच आरोग्यसंपन्न समाजासाठी तंबाखू नियंत्रण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. त्यादृष्टीने सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्यासोबतच विविध स्वंयसेवी संस्था, शाळा यांनी सक्रिय सहभाग घेवून प्रभावी जनजागृती करावी. शालेय विद्यार्थ्यांना तंबाखूच्या दुष्परिणामांची माहिती व्हावी यासाठी जनजागृती करावी.

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
**आत्ताच एक्सप्रेस**



# जिल्हाधिकाऱ्यांचा 'ॲक्शन मोड': बालमजुरी विरोधात आता थेट धाडसत्र!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/जालना जिल्ह्याला बालमजुरी आणि कॉपीमुक्त करण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी प्रशासकीय यंत्रणेला युध्दपातळीवर कामाला लागण्याचे आदेश दिले आहेत.

केवळ चर्चा नको, तर आता प्रत्यक्ष धाडसत्र राबवा, अशा कडक शब्दांत त्यांनी पोलीस आणि कामगार विभागाची कानउघाडणी केली असून, बालमजुरी आढळल्यास संबंधित मालकांविरुद्ध थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.

बालमजुरीच्या 'हॉट स्पॉट'वर होणार स्ट्राईक!

राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार, २६ जानेवारी ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत 'बचाव आणि पुनर्वसन' मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेत जालन्यातील हॉटेल, गॅरेज, वीटभट्ट्या आणि धोकादायक उद्योगांमधील बालमजुरांची सुटका करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी विशेष 'धाडसत्र'




(ठरळवी) राबवण्याचे आदेश दिले आहेत.

प्रत्येक पोलीस ठाण्याला टार्गेट: प्रत्येक पोलीस ठाण्याच्या प्रमुखांनी आपापल्या हद्दीतील किमान ५ बालकामगारांची सुटका करून त्यांचे पुनर्वसन करणे बंधनकारक आहे.मालकांना बसणार मोठा दंड: बालमजूर ठेवणाऱ्या मालकाकडून प्रति बालक २० हजार रुपये दंड वसूल करून तो जिल्हा बाल कल्याण निधीत जमा केला जाईल.वेठबिगारीवर वचक: जर मालकाने पालकांना आगाऊ पैसे (उचल) देऊन मुलाला कामावर ठेवले असेल, तर तो 'वेठबिगारी'चा गुन्हा मानला जाईल आणि कठोर कारवाई होईल.

बालमजुरी हा मुलांच्या भविष्यावर झालेला घाला आहे.

जे पोलीस अधिकारी या मोहिमेत उत्कृष्ट कामगिरी करतील, त्यांना 'बालस्नेही पोलीस पुरस्कार' देऊन गौरवण्यात येईल. पण हलगर्जीपणा करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. - आशिमा मित्तल, जिल्हाधिकारी, जालना

**कॉपीबहाद्दरांना बसणार 'ड्रोन'चा दणका!**

दहावी आणि बारावीच्या परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासन आता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणार आहे. जिल्ह्यातील ७९ बारावी आणि १०२ दहावीच्या परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्हीची नजर असेलच, पण संवेदनशील केंद्रांवर 'ड्रोन कॅमेरे' तैनात केले जाणार आहेत.

**परीक्षा केंद्रांवरील फिल्डिंग:** जिल्ह्यातील १२ संवेदनशील केंद्रांचे ड्रोनद्वारे चित्रीकरण होणार.

परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात जमावबंदीचे आदेश.

गैरप्रकार रोखण्यासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त आणि भरारी पथकांचा गराडा.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, पोलीस उपअधीक्षक रवींद्र निकाळजे, शिक्षणाधिकारी बाळू खरात यांच्यासह सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी उपस्थित होते.

तुमच्या परिसरात बालमजुरी होत असल्याचे आढळल्यास तात्काळ 'चाइल्ड हेल्पलाईन १०९८' किंवा कामगार विभागाशी संपर्क साधावा. बालकांचे भविष्य वाचवणे ही केवळ प्रशासनाचीच नाही, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे.

# रामेश्वर सहकारी साखर कारखान्यात कोट्यवधींचा घोटाळा?

**आत्ताच एक्सप्रेस**

**भोकरदन (प्रतिनिधी)** शेतकऱ्यांच्या घामातून उभा राहिलेला रामेश्वर सहकारी साखर कारखाना म्हणजे काही लोकांची खाजगी मालमत्ता नाही. कारखान्याच्या कारभारात पारदर्शकता नसून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा संशय आहे. जर प्रशासनाने तातडीने माहिती दिली नाही, तर हा लढा थेट मंत्रालयापर्यंत नेऊ, असा इशारा संस्थापक सभासद के. व्ही. बोरसे (बोरसे गुरुजी) यांनी दिला आहे.



**'बोरसे गुरुजी' आक्रमक; चौकशीची मागणी!**

**शेतकऱ्यांच्या शेअर्सचे काय झाले?**

करजगाव (ता. भोकरदन) येथील बोरसे गुरुजींनी कारखान्याच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. सुरुवातीच्या काळात सोसायट्यांकडून कर्ज काढून शेतकऱ्यांनी या कारखान्याचे शेअर्स घेतले. आज तेच कर्जदार शेतकरी कारखान्याच्या प्रक्रियेतून बाहेर फेकले गेले आहेत.

बोरसे गुरुजींनी उपस्थित केलेले मुख्य मुद्दे:

**मतदार यादीतून हेतुपुरस्पर वगळणे:** जुन्या आणि संस्थापक सभासदांची नावे मतदार यादीतून का हटवण्यात आली?माहिती लपवण्याचा प्रयत्न: सर्वसाधारण सभेची नोटीस किंवा निवडणूक कार्यक्रमाची माहिती सभासदांपर्यंत का पोहोचवली जात नाही? **अनुदानाचा हिशोब कुठे?:** केंद्र आणि राज्य सरकारकडून मिळालेले कोट्यवधींचे अनुदान नेमके कुठे खर्च झाले? कारखाना जाणीवपूर्वक तोट्यात दाखवला जातोय का?**मालमत्तेवर डोळा:** कारखान्याच्या जमिनी आणि मौल्यवान मालमत्ता हडपण्याचे काही लोकांचे मनसुबे असल्याचा खळबळजनक आरोप त्यांनी केला आहे.आम्ही कारखान्याला रक्ताचे पाणी करून उभे केले आहे. आज प्रशासनाचा कारभार एखाद्या खाजगी मालमत्तेसारखा सुरू आहे. आम्हाला अंधारात ठेवून जर भ्रष्टाचार केला जात असेल, तर तो सहन केला जाणार नाही. प्रशासनाला माहिती देण्याबाबत पत्र दिले आहे; उत्तर न मिळाल्यास रस्ता रोको आणि न्यायालयीन लढाई अटळ आहे! - के. व्ही. बोरसे (संस्थापक सदस्य)कारखान्याच्या कामकाजाबाबत अनेक संस्थापक सदस्यांमध्ये तीव्र असंतोष आहे. या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी लवकरच सर्व नाराज सभासदांची एक 'सामूहिक सभा' आयोजित करण्यात येणार आहे. या सभेत कारखान्याच्या आर्थिक घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी वरिष्ठांकडे धाव घेण्याबाबत ठोस निर्णय घेतला जाणार आहे.आता चेंडू कारखाना प्रशासनाच्या कोर्टात असून, बोरसे गुरुजींच्या पत्राला प्रशासन सकारात्मक उत्तर देणार की संघर्षाला तोंड फुटणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## जाफराबादमध्ये आज शिवसेना दलित आघाडीचा भव्य मेळावा; ॲड. भास्करराव मगरे करणार मार्गदर्शन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जाफराबाद/प्रतिनिधी**/तालुक्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण ढवळून काढण्यासाठी आज, ५ फेब्रुवारी रोजी शिवसेना दलित आघाडीच्या वतीने एका विशेष मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा जाफराबाद येथील बसस्थानकाजवळील शिवसेना व युवासेना संपर्क कार्यालयात सकाळी ११ वाजता पार पडणार आहे.



या मेळाव्याचे मुख्य आकर्षण शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख तथा भूमिहीन कास्तकरांचे खंबीर नेते ॲड. भास्करराव मगरे हे असून, ते उपस्थितांना संघटनेची पुढील रणनीती आणि दलित समाजाचे प्रश्न यावर सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत.याप्रसंगी शिवसेनेचे अनेक दिग्गज पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत, ज्यात प्रामुख्याने भूषण शर्मा: शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा नगरसेवक,दत्ता बंगाळे: शिवसेना तालुकाप्रमुख,

बालाजी पवार: युवासेना तालुकाप्रमुख,फारुक राजु: शहरप्रमुख,रमने: शहरप्रमुख,गजानन खंबाट: युवासेना शहरप्रमुख या मेळाव्याच्या माध्यमातून शिवसेना दलित आघाडीचे संघटन अधिक मजबूत करणे आणि तालुक्यातील दलित बांधवांच्या समस्यांना वाचा फोडणे हा मुख्य उद्देश आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आणि सामाजिक सलोखा राखण्यासाठी हा मेळावा अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.या मेळाव्याला जाफराबाद तालुक्यातील जास्तीत जास्त कार्यकर्त्यांनी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवसेना, युवासेना, दलित आघाडी आणि किसान सेनेच्या वतीने करण्यात आले आहे.

# जालन्याच्या शिरपेचात मानाचा तुरा: 'अविष्कार' संशोधन स्पर्धेत जेईएस महाविद्यालयाचा डंका!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/जालना येथील जालना एज्युकेशन सोसायटीच्या (जेईएस) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने संशोधन क्षेत्रात राज्याच्या नकाशावर आपली मोहोर उमटवली आहे. परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ येथे नुकत्याच संपन्न झालेल्या १८ व्या महाराष्ट्र राज्यस्तरीय आंतर-विद्यापीठ संशोधन परिषद 'अविष्कार' मध्ये महाविद्यालयाचे पी.एचडी. संशोधक विद्यार्थी योगेश उरदुखे यांनी दैदिप्यमान यश संपादन केले.

**परभणी येथे पार पडलेल्या १८ व्या राज्यस्तरीय 'अविष्कार' परिषदेत योगेश उरदुखे यांच्या 'फंगल स्पोर डिटेक्टर' उपकरणाची बाजी; शेतकऱ्यांसाठी ठरणार वरदान.**

योगेश यांनी सादर केलेल्या 'पोर्टेबल फंगल स्पोर डिटेक्शन डिव्हाइस' (Portable Fungal Spore Detection Device) या नाविन्यपूर्ण उपकरणाला प्राईज फॉर इनोव्हेशन देऊन गौरविण्यात आले.

**शेती क्षेत्रातील क्रांतीकारी संशोधन**

योगेश उरदुखे यांनी आपले संशोधन 'शेती आणि पशुसंवर्धन' या श्रेणीमध्ये सादर केले होते. वनस्पतींवर पडणाऱ्या बुरशीजन्य रोगांचा वेळीच प्रादुर्भाव ओळखणे अनेकदा शेतकऱ्यांसाठी कठीण जाते. मात्र, योगेश यांनी विकसित केलेले हे पोर्टेबल उपकरण अत्यंत कमी वेळात आणि अचूकपणे बुरशीच्या बीजाणूंचे (Spores) अस्तित्व शोधून काढते. यामुळे पिकांचे नुकसान होण्यापूर्वीच त्यावर उपचार करणे शक्य होणार असून, हे उपकरण भविष्यात शेतकऱ्यांसाठी मोठे वरदान ठरणार आहे.

या राज्यस्तरीय परिषदेत संपूर्ण महाराष्ट्रातील २६ सार्वजनिक आणि कृषी विद्यापीठांमधून शेकडो संशोधक विद्यार्थी सहभागी झाले होते. या अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत योगेश यांच्या उपकरणाच्या उपयुक्ततेची आणि तांत्रिक बाबींची दखल घेत राज्यस्तरावर त्यांची निवड करण्यात आली.

मार्गदर्शक व मान्यवरांकडून कौतुक

योगेश यांना या संशोधनासाठी डॉ. उमेश मोगले (वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख),डॉ. गणेश कुलकर्णी (प्राध्यापक),डॉ. राजेश सरकटे (अविष्कार कमिटी समन्वयक) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. पुरुषोत्तमजी बगडिया, सचिव श्री. श्रीनिवासजी भक्कड, आणि प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी योगेशचे विशेष अभिनंदन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थी जागतिक दर्जाचे संशोधन करू शकतात, हे या यशाने सिद्ध झाल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

**तरुणांना प्रेरणादायी संदेश: केवळ पदवी नको, विज्ञानातून समस्या सोडवा**

आपल्या यशाबद्दल बोलताना योगेश उरदुखे म्हणाले, हे यश माझ्या एकट्याचे नसून माझ्या मार्गदर्शकांचे आणि संपूर्ण विभागाचे आहे. संशोधनाच्या प्रवासात अडथळे येतात, पण विद्यार्थ्यांनी हार मानू नये. आजच्या तरुणांनी केवळ पदवी मिळवण्यासाठी अभ्यास न करता, समाजाच्या आणि विशेषतः आपल्या बळीराजाच्या समस्या सोडवण्यासाठी 'आऊट ऑफ द बॉक्स' विचार करावा. जिद्द आणि चिकाटी असेल तर यश नक्कीच मिळते.या यशाबद्दल महाविद्यालयीन कर्मचारी, प्राध्यापक आणि पी.एचडी. संशोधक विद्यार्थ्यांकडून योगेशवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जालना जिल्ह्याचा 'अपघातमुक्त' संकल्प: दरमहा अपघातांचे विश्लेषण करून तातडीने उपाययोजना करा - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जिल्ह्यातील रस्ते अपघातांचे प्रमाण चिंताजनक असून, ते कमी करण्यासाठी दरमहा अपघातांचे सखोल विश्लेषण करा आणि सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने तातडीच्या उपाययोजना करा, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित 'जिल्हा रस्ता सुरक्षा समिती' च्या बैठकीत त्या बोलत होत्या.अपघातांची भीषण आकडेवारी: वर्षभरात ३५५ मृत्यू बैठकीत सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार, सन २०२५ मध्ये जालना जिल्ह्यात एकूण ७५६ रस्ते अपघात झाले. यापैकी ३१८ अपघात हे अत्यंत भीषण (जीवघेणे) ठरले असून, त्यात ३५५ नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. ही आकडेवारी गंभीर असून प्रशासनाने आता 'क्शन मोड' मध्ये काम करण्याची गरज जिल्हाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

**ब्लॅक स्पॉटवर उपाययोजना:** जालना शहर आणि जिल्ह्यातील प्रमुख अपघातप्रवण स्थळांची (Black Spots) कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या ठिकाणी सूचक आणि चेतावणी देणारे फलक त्वरित लावण्याच्या सूचना बांधकाम विभागाला देण्यात आल्या.

AI आधारित देखरेख (खढचड प्रणाली): जिल्ह्यात लवकरच 'इंटिग्रेटेड ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम' (ITMS) अंतर्गत गॅन्ट्री प्रणाली कार्यान्वित केली जाणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर (AI) आधारित ही प्रणाली खालील नियमभंगांवर स्वयंचलित ई-चलानद्वारे कारवाई करेल:

विना हेल्मेट दुचाकी चालवणे.,सीट बेल्टचा वापर न करणे.,वेगमर्यादेचे उल्लंघन करणे.,ट्रॅफिक सिग्नल तोडणे.

**हेल्मेट सक्ती व आवाहन:** अपघातांमध्ये दुचाकीस्वारांचे प्रमाण सर्वाधिक असल्याने, दुचाकी चालकांनी स्वतःच्या जीवाच्या रक्षणासाठी हेल्मेटचा वापर सक्तीने करावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

या बैठकीस उपप्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता स्मिता पवार, पोलीस उपअधीक्षक रविंद्र निकाळजे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. रस्ते सुरक्षा केवळ कागदावर न राहता ती प्रत्यक्ष अंमलात आणण्यासाठी पोलीस, परिवहन आणि बांधकाम विभागाने हातात हात घालून काम करावे, असे निर्देशही यावेळी देण्यात आले.

**अपघातमुक्त जिल्हा घडवणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून, नागरिकांनीही वाहतूक नियमांचे पालन करून सहकार्य करावे.**
**- आशिमा मित्तल, जिल्हाधिकारी, जालना**

## प्रशिक्षण संस्थाना प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जिल्हास्तरीय सर्वसाधारण योजना अंतर्गत किमान कौशल्य विकास कार्यक्रम सन २०२५-२६ मध्ये प्रशिक्षण राबविण्यासाठी इच्छुक व पात्र प्रशिक्षण संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

नॅशनलत स्कील डेव्हलपमेंट कॉरपोरेशन (NSDC) यांचेकडील Skill India Digital Hub या पोर्टलवर सूचीबद्ध (Listed) असलेल्या प्रशिक्षण संस्था या योजनेअंतर्गत प्रस्ताव सादर करण्यास पात्र राहणार आहेत.

प्रस्ताव सादर करण्यासाठी आवश्यक विहित नमुन्यातील परिशिष्टे तसेच मान्यता प्राप्त अभ्यासक्रमांची यादी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

पात्र व इच्छुक प्रशिक्षण संस्थांनी अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना या कार्यालयास प्रत्यक्ष अथवा दुरध्वनी क्रं. ०२४८२-२९९०३३ वर कार्यालयीन वेळेत संपर्क करून विहित नमुन्यात परिपूर्ण व आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव दि. १६ फेब्रुवारी, २०२६५पर्यंत सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जालना जिल्हाधिकारी कार्यालयात संत शिरोमणी गुरु रविदास महाराजांना अभिवादन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांच्या ६४९ व्या जयंतीनिमित्त जालना जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात एका विशेष सन्मान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून संतांच्या स्मृतींना उजाळा दिला.

कार्यक्रमाची सुरुवात नायब तहसीलदार तुषार निकम आणि अव्वल कारकून दीपाली वानखेडे (राऊत) यांच्या हस्ते संत रविदास महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थित सर्वांनी संतांच्या कार्याला विनम्र अभिवादन केले.

क्रांतिकारक आणि मानवतावादी विचारांचा जागर

मुख्य वक्ते ड. डी. एस. सोनवणे यांनी संत रविदास महाराजांचा जीवन परिचय करून दिला. त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले की,

संत रविदास हे १५ व्या शतकातील केवळ एक संत नव्हते, तर ते एक महान क्रांतिकारक, समतावादी, मानवतावादी आणि विज्ञानवादी विचारवंत होते.त्यांनी संतांच्या भक्तीमार्गासोबतच श्रम-सन्मान, सामाजिक न्याय आणि समतेच्या शिकवणीवर विशेष प्रकाश टाकला. संतांचे विचार आजही समाजाला दिशा देणारे आहेत, असे प्रतिपादन त्यांनी केले.

सामाजिक कार्यकर्ते राहुल सत्यनारायणजी करनाडे यांनी उपस्थित सर्वांना जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. सरकारी कार्यालयांमध्ये अशा महापुरुषांच्या जयंतीचे आयोजन होणे हे सामाजिक एकतेचे आणि वैचारिक प्रगल्भतेचे उत्तम उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी आयोजक, वक्ते आणि कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

या सोहळ्याला सामाजिक आणि शासकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यामध्ये कैलाश पाटील, दीपक डोंगरे, सतीश फत्पुरे, बाबासाहेब अंबडकर, दशरथ इंगळे,संतोष लांबकाने, युवराज कुरिल, धरमचंद गरंडवाल,सुनील कटारिया, करण कुमठे,शासकीय कर्मचारी सुनील काळुंके आणि इतर कर्मचारी वृंद संत रविदास महाराजांच्या शिकवणीतून मिळणारा समता आणि भक्तीचा संदेश आजही तितकाच प्रस्तुत असून, या कार्यक्रमाने जिल्हाधिकारी कार्यालयात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

## ओजस कॉलेज ऑफ फिजिओथेरपीमध्ये 'जागतिक कर्करोग दिन' उत्साहात साजरा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/कर्करोगासारख्या गंभीर आजाराविषयी समाजात जनजागृती व्हावी आणि या आजाराच्या लढ्यात फिजिओथेरपीचे महत्त्व अधोरेखित व्हावे, या उद्देशाने श्री साई जनविकास प्रतिष्ठान (आंबेवाडी) संचलित, ओजस कॉलेज ऑफ फिजिओथेरपी येथे ४ फेब्रुवारी रोजी 'जागतिक कर्करोग दिन' निमित्त विशेष जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेली रांगोळी स्पर्धा. या स्पर्धेचा विषय कर्करोगाच्या उपचारांमध्ये फिजिओथेरपीची भूमिका - युनायटेड बाय युनिक असा होता. विद्यार्थ्यांनी आपल्या कलाकृतीतून कर्करोग रुग्णांच्या जीवनातील आशा, धैर्य आणि सकारात्मकतेचे प्रभावी दर्शन घडवले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कृष्ण कुमार सिंग यांनी उपस्थितांना संबोधित करताना कर्करोग पुनर्वसनामध्ये (Cancer Rehabilitation) फिजिओथेरपीच्या योगदानावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की कर्करोगाच्या उपचारांदरम्यान आणि उपचारानंतर रुग्णाला अनेक शारीरिक अडचणींचा सामना करावा लागतो. फिजिओथेरपीमुळे रुग्णांचे जीवनमान सुधारते, त्यांच्यातील शारीरिक क्षमता वाढते आणि त्यांना दैनंदिन कामे करण्यासाठी स्वावलंबी बनवता येते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. याप्रसंगी डॉ. निधी शर्मा, डॉ. राम अवतार, डॉ. अमर डामले, डॉ. किरण कुमार, डॉ. शाम वायाळ, डॉ. गौरी सॉर्टी, डॉ. शुभांगी मुकुंद, डॉ. डीसूझा बेनेडीन आणि डॉ. गायत्री कलंत्री यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा कार्यक्रम केवळ शैक्षणिक न ठरता एक सामाजिक संदेश देणारा उपक्रम ठरला.

## परतूर येथे शिवजन्मोत्सव समिती २०२६ ची घोषणा: अध्यक्षपदी अतुल हजारे पाटील

आत्ताच एक्सप्रेस

परतूर /प्रतिनिधी/ शासकीय विश्रामगृहात सर्वपक्षीय आणि सर्व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा संघटक विठ्ठल बरकुले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत, यंदाचा शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यासाठी नवीन कार्यकारी समितीची बिनविरोध निवड करण्यात आली.

नूतन कार्यकारिणी २०२६समितीच्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या खालील पदाधिकाऱ्यांकडे सोपवण्यात आल्या आहेत:पदनावअध्यक्षअतुल हजारे पाटीलसचिवनामदेव गोरेउपाध्यक्षविठ्ठल सोनपावले, विशाल शिंदेकार्याध्यक्षविकास मोरेसहसचिवरफिक सतार कुरेशीकोषाध्यक्षआकाश काळे, प्रवीण प्रधानसंघटकगोपी ठाकूर, प्रवीण पेडगावकरसल्लागार आणि मार्गदर्शक मंडळउत्सवाचे नियोजन चोख व्हावे यासाठी अनुभवी नेत्यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यात सावता काळे, अर्जुन राठोड, संभाजी घनवट, अर्जुन जगताप, ॲड. सुरेश काळे, नरेश कांबळे, सिद्धेश्वर लहाने आणि विजय यादव यांचा समावेश आहे.

तसेच, विजय नाना राखे, विनायक काळे, शहाजी राक्षे, पांडुरंग नवल, अविनाश शहाणे यांसारख्या ज्येष्ठ मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडणार आहे.प्रमुख उपस्थितीया बैठकीला संदीप बाहेकर, प्रकाश चव्हाण, डॉ. प्रदीप सातोणकर, रमेश भापकर, शत्रुघ्न कणसे, संपत टकले, इजरान कुरेशी, रज्जाक कुरेशी आणि सतीश सोनवणे यांच्यासह शहरातील विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. थोडक्यात: सर्वधर्मसमभाव आणि एकीचे प्रतीक म्हणून परतूरमध्ये सर्वपक्षीय समितीद्वारे यंदाची शिवजयंती साजरी केली जाणार आहे. नवनिर्वाचित अध्यक्षांनी सर्व शिवप्रेमींना सोबत घेऊन भव्य सोहळा आयोजित करण्याचा मानस व्यक्त केला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner Publisher Sugriv Sopanrao Mundhe Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (Editor - Sugriv Sopanrao Mundhe) Office Ph. : 0240-2474813